

# छात्र प्रबोधन

सौर पौष शके १९२०

वर्ष ७ अंक ६



ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी अभिनव मासिक!


त्या तेजस्वी डोळ्यांमधली वीज अजुन सांगते
उत्तिष्ठत जाग्रत ! बंधूंनो उत्तिष्ठत जाग्रत !
त्या डोळ्यांनी अनागताचा वेध घेउनी
भारतभूच्या भवितव्याचे स्वप्न भव्य पाहिले
आत्म्याचे संगीत ऐकवुनि जडवादी दुनियेला
भारत विश्वगुरू करण्याचे कार्य अजुनि राहिले
त्या कार्याचा वसा घेउ या, तोच ध्यास ध्येय

# अंतरंग

छात्र
प्रबोधन
वर्ष ७ अंक ६
सौर पौष
शके १९२०

२ **संवाद** : प्रा. महेन्द्र सेठिया

३ **आमचे दोन पत्ते** : श्री किरण पुरंदरे

९ **कॅमेऱ्याशी हितगुज** : डॉ. प्रकाश जोगळेकर

११ **जरूर पाहावे असे काही**
**बेन-हर** : प्रा. नीलिमा करमरकर

१४ **ओळख**
**'भारतरत्न' पुरस्कारांची** : सौ. वर्षा कुलकर्णी

१५ **त्वरित फाशी द्यावं** : श्रीमती नयनतारा देसाई

१९ **कवक प्रसृष्टी** : डॉ. पुरूषोत्तम जोशी

२१ **मधुबोल** : प्रा. संजीवनी बोकील

२३ **साने गुरूजी - एक आगळे वेगळे शिक्षक** :
डॉ. अरविंद कपोले

२४ **कविता पानोपानी**
**मुशाफिराचे गाणे** : श्रीमती शांता शेळके
**भ्रष्टाचार निंदा स्तोत्रम्** : कु. नेहा धर्माधिकारी

२७ **१९९८... बिंब प्रतिबिंब** : श्री. राहुल नांगरे

३१ **१०० दिवसांची साखरशाळा** :
श्रीमती गीतांजली देगावकर

३२ **उपक्रम व स्थानिक पत्ते** :

**'तुम्हीच संपादक व्हा!'** हस्तलिखितनिर्मिती स्पर्धा **व 'पंख सुरांचे'** ध्वनिफीतनिर्मिती स्पर्धा, यामध्ये भाग घेतलाय ना! १५ जानेवारीपर्यंत आपली साहित्यकृती, छात्र प्रबोधन पुणे कार्यालयात अवश्य पाठवावी.

ॐ

**इवली शल्ये रुपती खुपती,**
**मात करू दे त्यांच्यावरती**
**प्रगल्भतेचे पंख लेऊनी**
**ने ज्योतिर्जगतात**

**संपादक, प्रकाशक**
महेन्द्र सेठिया
**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया B.E., M.Ed.
शैलजा देशमुख M.A. M.Ed.
दत्ता श्री. टोळ B.A., B.COM.
विवेक पोंक्षे M.SC, B.Ed.
**मुखपृष्ठ पारदर्शिका**
रोहित पक्ष्यांचे स्थलांतर
श्री. किरण पुरंदरे यांच्या संग्रहातून
**मलपृष्ठावरील कविता**
डॉ. संगीता बर्वे
**मलपृष्ठ व आतील चित्रे**
गिरीश सहस्त्रबुद्धे
**अक्षरजुळणी**
प्रिंट लिंग, पुणे

**संपर्क पत्ता**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ,
पुणे - ४११०३०
☎०२१२-४७७६९१,
४७८०९५

**प्रकाशन दिनांक**
राष्ट्रीय सौर ११ पौष शके १९२०
१ जानेवारी १९९९.

**वर्गणी भारतात**
**वार्षिक** : रु.१२५/-**द्वैवार्षिक** : रू.२४०/
**त्रैवार्षिक** : रु.३५०/-आजीवन :रु.२०००/

**भारताबाहेर - वार्षिक** : ३० डॉलर

पौषामधली पहाट, साऱ्या आसमंतावर थंडीची गहिरी लाट.

## नावीन्यपूर्ण बक्षीस योजना–
## प्रगतीला बक्षीस
### स्पर्धा स्वतःशी च!

गेल्या वर्षीच्या वार्षिक परीक्षेत आपल्याला जितके गुण पडले असतील त्यापेक्षा, दिलेल्या कोष्टकाप्रमाणे अधिक गुण या वर्षीच्या वार्षिक परीक्षेत तुम्ही मिळवले तर तुम्हाला सर्वांना बक्षीस!

| गेल्या वर्षीच्या वार्षिक परीक्षेतील एकूण टक्के | बक्षीस मिळविण्यासाठी यावर्षीच्या वार्षिक परीक्षेत करावयाची वाढ (टक्क्यांमध्ये) |
|---|---|
| ६० पेक्षा कमी | १५ |
| ६१ ते ७० | १० |
| ७१ ते ८० | ७ |
| ८१ ते ८५ | ५ |
| ८६ ते ९० | ३ |
| ९१ व पुढे | तेवढेच टिकवणे व अभ्यासाव्यतिरिक्त किमान ३ उपक्रमांमध्ये सहभागी होणे. |

ज्या विद्यार्थ्यांना हे बक्षीस मिळवायचे आहे अशांनी, ३१ जानेवारी ९९ पर्यंत छात्र प्रबोधनच्या पत्त्यावर एक पोस्टकार्ड पाठवावे. त्यामध्ये स्वतःचे पूर्ण नाव, शाळा, इयत्ता–तुकडी, पत्ता, मागील वर्षाचे टक्के, या वर्षी किती टक्के गुण मिळणार? स्वतःची स्वाक्षरी व आई–वडील–वर्गशिक्षक यापैकी कोणाची तरी स्वाक्षरी इ. गोष्टी लिहाव्यात. वार्षिक परीक्षेचा निकाल लागल्यावर त्या निकालाची एक प्रत आमच्याकडे आठवणीने पाठवा. तुम्हा सर्वांना बक्षीस मिळावे यासाठी आमच्यातर्फे मनःपूर्वक शुभेच्छा!

जिद्दीने, धडपड करू इच्छिणारे प्रबोधक हे बक्षीस मिळविण्याची संधी सोडणार नाहीत !

### विशेष आनंद वार्ता
### 'छात्र प्रबोधन दिवाळी अंक ९८' ला सर्वात्कृष्ट दिवाळी अंकाचे पारितोषिक जाहीर!

'छात्र प्रबोधनच्या यावर्षीच्या दिवाळी अंकास स्व. सीतादेवी सोमाणी प्रतिष्ठान, बार्शी, जि.सोलापूर तर्फे 'बालकुमारांसाठीचा सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक' म्हणून पुरस्कार जाहीर झाला आहे. १००१/– रोख, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## संवाद

*प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,*

*या पूर्वीचा अंक आवडला का ? तुमच्यापैकीच काहींनी तयार केलेला हा अंक खरोखरच चांगला झालाय. त्यामुळे आता वर्षातून दोनदा पूर्णतः तुम्हा मुला–मुलींनी तयार केलेला अंक काढायचा, असे आम्ही ठरवतोय. तेव्हा जून ९९ मधील अंक हा पुन्हा फक्त तुमच्या साहित्य अन् कलाकृतीतून तयार होणारा अंक असेल. तेव्हा आपापल्या लेखण्या सरसावून लिहिते व्हा! तत्पूर्वी अनेक जण 'तुम्हीच संपादक व्हा!' या स्पर्देत सहभागी झाला असाल. तुमची छान छान हस्तलिखिते अन् ध्वनिफितीही वाचायला, ऐकायला आम्हाला नक्कीच आवडतील. तेव्हा १५ जानेवारी पूर्वी हस्तलिखिते/ध्वनिफिती पाठवताय ना !*

*मागच्या महिन्यात मुख्यतः मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील दौरे झाले. अनेक शाळा–महाविद्यालयातील मुला–मुलींसमोर व्याख्याने झाली. गप्पा–प्रश्नोत्तरेही झाली. मी सर्वांना प्रश्न विचारला, ''तुमच्यापैकी कोण कोण बुद्धिमान आहेत?'' अन् क्वचित काही जण सोडले तर बहुतेकांनी नकारार्थी मान हलवली. मला मोठी गम्मत वाटली.*

*खरं तर वर्गात पहिला येणार तोच फक्त बुद्धिविषयक ही संकल्पना आता आपण सर्वांनीच बदलायला हवी. ज्ञान प्रबोधिनीमध्ये बुद्धिविषयक झालेल्या संशोधनातून असे सिद्ध झाले आहे की प्रत्येकच सामान्य वाटणाऱ्या व्यक्तीकडे बुद्धिच्या कोणत्या ना कोणत्या पैलूंवर असामान्य गुण असतात. ते प्रत्येकाला माहीत नसतात इतकेच. याचं ही कारण ते रोजच्या अभ्यासक्रमात, व्यवहारात ते फारसे वापरले जात नाही म्हणून! याचाच अर्थ प्रत्येकजण हा कोणत्या तरी पैलूंवर इतरांपेक्षा अधिक बुद्धिमान असतो. त्यामुळे आपण स्वतःला कमी लेखण्याचे कारण नाही.*

*आइनस्टाइनसारखा प्रख्यात शास्त्रज्ञदेखील असे म्हणतो, की त्याने त्याच्याजवळ असलेल्या बुद्धिमत्तेच्या जेमतेम दहा टक्केच बुद्धिमत्ता वापली, ती आपण बहुतेक आपल्या बुद्धिमत्तेच्या एक शतांश टक्के इतकीही बुद्धिमत्ता वापरत नसणार, असेच मला वाटते. स्वतः बुद्धिमान आहोत असा स्वतःवर विश्वास ठेवणं, बुद्धिच्या विविध क्षमता वापरायला लागतील अशा संधी मिळवणं, त्या घेणं, त्या संधींचा पुरेपूर वापर करणं, यातून बौद्धिक क्षमतांची ओळख होईल, त्यांचा कस लागेल. क्वचित प्रसंगी एखाद्या प्रकारची बुद्धिमत्ता आपल्याकडे कमी प्रमाणात आहे हे लक्षात येईल. अनेक प्रकारच्या बौद्धिक क्षमता प्रशिक्षणातून, विविध तंत्रांच्या आधारे विकसित करता येतात. त्याचा उपयोग करून स्वतःमधल्या सुप्त क्षमतांचा विकास आपण करून घेऊया. असं करायचं असेल तर आळस झटकावा लागतो, विकास करायची, प्रगती करायची मनापासून इच्छा लागते, चिकाटी लागते, नवीन अनुभव घेण्यासाठी थोडं धाडस लागतं, कष्ट करायची तयारी लागते अन् योग्य मार्गदर्शन लागतं.*


*ज्यांना पहिल्या पाच गोष्टी करण्याची मनापासून इच्छा आहे त्यांना योग्य मार्गदर्शन मिळायला फार अडचण पडू नये आणि पडलीच तर छात्र प्रबोधनशी त्यासाठी संपर्क साधायला हरकत नाही.*

*नेहमीप्रमाणेच नववर्षाच्या शुभेच्छा गुढीपाडव्याला!*
*मकरसंक्रांतीनिमित्त शुभेच्छा! स्नेह, आपुलकीचे आपल्या सर्वांचे वर्तुळ आपण वाढवूयात, ते अधिक दृढ करूयात. मकरसंक्रांतीसारखे सण याची आठवण करून द्यायला निश्चितच उपयोगी पडतात.*
*बरंय तर !*

***सस्नेह तुमचा***

***महेन्द्र सेठिया***

खडतर असले वाण घेतले स्वच्छेने तर आम्ही आमुच्या, या भूमीचे भाग्य अखेरी प्रयत्नातुनी घडेल आमुच्या.




माझ्या घरासमोरचे मळे अतोनात हिरवे झालेले असतात. श्रावणातलं अस्मानी अमृत पिऊन तिथल्या जमिनीने जणू, जीर्ण तपकीरी वेष वैशाखातल्या बोहाऱ्याला देऊन टाकलेला असतो आणि तजेलदार हिरव्या रंगाचा भरजरी शालू पांघरून ती नटली-मुरडलेली असते. बहरलेले मळे हे माझ्या डोळ्यांचं विसावण्याचं एक ठिकाण असतं. त्या हिरव्या रंगाच्या भरघोस पर्णराशी पाहताना मनाला केवढं समाधानी वाटतं आणि हिरव्या रंगाच्या छटा तरी किती! आंब्याचा काळपट हिरवा, चिंचेचा प्रकाशमान पोपटी, दोहोंच्या मधला पिंपळाचा तकतकीत हिरवा.

लाजऱ्या पाणकोंबड्यांची घरटी शोधण्यासाठी म्हणून मी मळ्यांमधून वाहणाऱ्या ओढ्याकाठी येतो. घाणेरी, करंजी अशा झुडूपांमध्ये या ओढ्याने स्वतःला गुरफटून घेतलेलं असतं. त्याचबरोबर जिथे जागा मिळेल तिथे गवत उगवलेलं होतं. त्यामुळे ठिकठिकाणी या ओढ्याचं पाणी लुप्त झालेलं असतं. एका रानवट शिंदीच्या झाडाला गारवेलीने लाडिक विळखा घालून त्यावर आपली निळी फुलं फुलवलेली असतात. चिखलात फसत, काट्यांनी बरबरटलेल्या फांद्या चुकवत मी कासवगतीने पुढे सरकत असतो. चिलारच्या प्रचंड जाळीतून पाणकोंबडीचं युगुल भांडखोर आवाजात बोलत असतं. पाण्याकाठच्या वनस्पतींच्या गचपणातून लांब ढांगा टाकत, भुंडी शेपूट उडवत, कीडे वेचत, लपून छपून वावरणारा हा सुंदर पक्षी आहे. पाण्यावर झुकलेल्या फांद्या माझं 'लक्ष्य' असतं, अर्थात मी आजूबाजूचे कितीतरी द्विजगण टिपलेले असतात. शिपाई आणि लालबुड्या बुलबुल, पपया आणि जंगल मैना, शिंजीर, दयाळ...

झुडूपांची दाटी संपते आणि मला ओढ्याचा मोकळा काठ मिळतो. समोर पाण्याने तयार केलेली मातीची भिंत असते. त्यात खंड्याचं बीळ असतं. तिथे त्याच्या पांढऱ्या विष्ठेचे शिडकावे असतात. हे बीळ म्हणजेच त्यांचं घरटं. एका जागी उभं राहून हे सगळं पाहताना मी इतका रमून गेलो होतो, की अचानक माझ्या जवळूनच आलेल्या एका तुतारीसारख्या तारस्वराने मी केवढा दचकलो!

मला त्याच अवस्थेत सोडून एक मोठ्या मुठीएवढा तपकिरी काळपट रंगाचा पक्षी अक्षरशः हिरव्या गवतातून फुटतो आणि ओढ्याच्या पाण्यावरून बाणासारखा सणाणत जातो. त्याबरोबरच ओढ्याच्या आसमंतात 'टीऽटुई, टीऽटुई!' असा तीव्र आवाज अधूनमधून येत राहतो. चवड्यांवर तोल सांभाळत येत राहतो. चवड्यांवर तोल सांभाळत, मान उंचावून मी त्या पक्ष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा पंख्यासारखी पांढरी शेपूट डोळ्यांत भरली. यानंतर मी त्याला मन मानेल तसं उडत अचानक गचकन् थांबा घेत हिरव्या झुडूपांच्या गर्दीत भिरभिरत उतरताना पाहिलं.

काही क्षणच निरखलेल्या त्या पक्ष्याचं नाव अनुभवाने झटकन माझ्या ओठांवर येतं 'तुतारी!' माझ्या अंगावर रोमांच उठतात. कारण त्या पक्ष्याने मला एक महत्त्वाची चाहूल दिलेली असते. या चिमुकल्याने हजारो परदेशी पाहुण्यांच्या आगमनाचं पत्रच बरोबर आणलेलं असतं. मी त्याचे दोन पत्ते उतरवून घेतो. एक एरंडवण्यातला... पुण्याचा आणि

आम्ही ध्येयमार्गी कसे थांबू कोठे? पथी थांबती चालता ते करंटे।

दुसर... युरोपातला!

काही दिवसांनी असेच दोन पत्ते असलेल्या द्विजांचे थवे वाऱ्याच्या पाठीवर बसून आभाळातून येणार आहेत, या कल्पनेनेच मी हुरळून गेलो. आता काही दिवसांनीच इतके दिवस लागून राहिलेली अनामिक हुरहूर संपणार होती. वर्षभरातल्या एका भारावून टाकणाऱ्या कालखंडाला सुरुवात झाली होती. माझ्या नजरेपुढे पक्ष्यांनी किलबिलणारं पाषाणचं तळं आलं. क्षितिजावरून पुढे पुढे सरकणारी भालकुंजांची धूसर माळ...

***''तुतारी हा पाणपक्षी भारतात जुलैच्या शेवटी शेवटी दिसू लागतो आणि मे च्या सुरवातीला तो परत जातो. या पक्षी जातीतले काही सभासद हिमालयात तात्पुरते दिसतात. प्रपंच न करणारे काही पक्षी उन्हाळासुद्धा भारतातच काढतात.''***

अवतरणात असलेली वरील वाक्ये पक्षी जीवनातील सर्वात रोमांचकारी घटनेचं वर्णन करतात. तो विषय म्हणजे स्थलांतर.

**एकमेवद्वितीय**

पक्ष्यांचे स्थलांतर ही जगातील अद्वितीय अशी जिवंत प्राण्यांची व्यापक हालचाल आहे. दरवर्षी हजारो, लाखो पक्षी त्यांच्या विणीच्या प्रदेशापासून उड्डाण घेतात आणि पुष्कळदा हजारो मैल अंतर उडत जाऊन काही महिन्यांनी परत येतात. जगण्यासाठी जास्तीत जास्त अनुकूल वातावरण आणि पुरेशी उपजिवीका मिळावी म्हणून पक्षी स्थलांतर करतात. हिवाळ्याबरोबरच पक्ष्यांच्या पर्यावरणात काही ठळक बदल घडून येतात. अन्नपुरवठ्यात घट होणं; दिवस लहान होणं, त्यामुळे अन्नशोधार्थ कराव्या लागणाऱ्या भ्रमंतीचा वेळ कमी होणे इ. लांबलेल्या उत्तरीय पावसात किंवा हिमवृष्टीनंतर जमीन पूर्णपणे झाकली जाते आणि बहुतेक पक्ष्यांना अन्न शोधणं कठीण जातं.

स्थलांतर ही एक उपजत जाणीव आहे. स्वयंस्फूर्ती आहे. थंडी पडण्यापूर्वी बराच काळ आधी पक्षी जास्त सुखदायक पर्यावरणाच्या शोधार्थ प्रस्थान ठेवतात. बिर्णाच्या प्रदेशात पुन्हा अनुकूलता येईपर्यंत म्हणजेच दिवस पुन्हा मोठे होईपर्यंत, अन्न पुन्हा मुबलक होईपर्यंत आणि हवामान पुन्हा सुखद होईपर्यंत ते अशा प्रदेशात वस्ती करतात.

जरी पक्ष्यांच्या स्थलांतरावर वरील बाह्य परिस्थितीचा प्रभाव असला तरी सुद्धा स्थलांतर काळापूर्वी कित्येक महिने आधी पक्ष्यांची शरीरांतर्गत यंत्रणा जागृत झालेली असते. बहुतेक स्थलांतरी उड्डाणे दीर्घ आणि अतिशय थकवा आणणारी असल्यामुळे त्यासाठी खणखणीत पूर्वतयारी करावी लागते. भावी शक्तीचा साठा करणे अत्यावश्यक असते. अनेक कीटकसेवी पक्षी त्यांचा नेहमीचा आहार सोडून जास्त साखर असलेल्या रसरशीत फळांच्या आहाराकडे वळतात. काही पक्षी की जे सर्वसाधारणपणे रात्री उडतात ते प्रवासाची तयारी म्हणून त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमांचा ताल बदलतात.

**वक्तशीरपणा**

उत्तरीय जंगलात आढळणाऱ्या चिमकुल्या विलो वॉरब्लर या पक्ष्यांच्या बाबतीत एक प्रयोग केला गेला. दरवर्षी सप्टेंबर महिन्यात हे पक्षी रात्री प्रवास करत दक्षिणेकडे म्हणजे मध्य आफ्रिकेकडे उडत जातात, हा निश्चित तपशील गोळा झाल्यावर काही पक्षी पिंजऱ्यात, परंतु त्यांच्या हिवाळी मुक्कामाशी मिळत्या-जुळत्या हवामानात ठेवले गेले. जसजसा त्यांचा प्रवासाचा काळ जवळजवळ येऊ लागला तसे रात्रीच्या काळात हे पक्षी, अस्वस्थपणे उड्या मारू लागले! विणीच्या प्रदेशात वसंत ऋतूत बहुतेक पक्ष्यांच्या वागणुकीत असेच बदल होतात. परतीच्या प्रवासाची वेळ हीसुद्धा फार महत्त्वाची असते. जर एखादा पक्षी त्याच्या विणीच्या प्रदेशात फार लवकर येऊन पोहोचला तर त्याला पुरेसं खाद्य मिळणार नाही. याउलट त्याला पोहोचण्यास जर उशीर झाला तर त्याला घरटं बांधण्यासाठी आवश्यक जागेची निवडच करता येणार नाही. यासाठी पक्ष्यांच्या शरीरातील काल यंत्रणा फार प्रभावी असते. वादळे किंवा वाईट हवेमुळेच एखाद्या वेळेस विलंब झाला तर; नाहीतर पक्षी फार वक्तशीर असतात. पाठीवर हिवाळा घेऊन येणारे आपले आभाळमित्र बरोबर कोणत्या दिवशी येतील हे सुद्धा आपण अंदाजाने सांगू शकतो. मात्र त्यासाठी आपणसुद्धा नियमित

आणि सलग काही वर्षे निरीक्षणे व नोंदी ठेवण्याच्या बाबतीत काटेकोर असलं पाहिजे.

फिरणाऱ्या ऋतुचक्राप्रमाणे पक्ष्यांच्या हालचाली होतात हे फार पूर्वीपासून लोकांना माहीत होते. पण पक्षी प्रवास का करतात किंवा ते कुठे जातात याविषयी लोकांच्या कल्पना फारच तऱ्हेवाईक होत्या. सस्तन किंवा सरपटणाऱ्या प्राण्यांप्रमाणे पक्षी प्रतिकूल परिस्थितीचा काळ झोपेत घालवतात किंवा सबंध हिवाळाभर ते स्वतःला पुरून घेतात असा समज होता.

पायात वाळा अडकवलेला एक धोबी पक्षी कमीत कमी २,००० कि.मी. लांब असलेल्या प्रायः त्याच्या हिमालयातील विणीच्या भूमीतून, मुंबईतील बॅडमिंटन कोर्ट एवढ्या मोठ्या असलेल्या एका विशिष्ट हिरवळीच्या तुकड्यावर सप्टेंबर महिन्यातल्या जवळपास एकाच तारखेला येतो, असं निरिक्षण केलं गेलं आहे.

प्रौढ पक्षी आणि पिल्लांच्या पायात वाळे घातल्याने पक्ष्यांच्या स्थलांतराविषयी खूप माहिती उपलब्ध झाली आहे. जपानी बनावटीच्या सहजी न दिसणाऱ्या जाळ्यांमध्ये पक्ष्यांना पकडून त्यांच्या पायात हलक्या ॲल्युमिनिअम धातूचे वाळे घालण्यात येतात. त्यांच्यावर क्रमांक, दिनांक, खुणेचे चिन्ह आणि पत्ता दिलेला असतो. त्या पक्ष्यांची सविस्तर वैयक्तिक माहिती एका नोंदवहीत ठेवली जाते आणि असे पक्षी मोकळे



सोडून पुन्हा काही अंतरावर पकडले जातात अथवा मारले जातात. त्यांच्या स्थलांतराची दिशा आणि स्थळ यांची माहिती मिळते.

जर्मनीमध्ये एक मुग्ध बलाक पकडून त्याच्या पायात वाळा अडकवण्यात आला. मुक्त केल्यानंतर तो ४,००० मैल दूर भारतातील बिकानेर येथे सापडला!

या वाळ्यांवरून पक्ष्यांच्या देशांतराची दिशा मुख्यत्वेकरून शरद ऋतुमध्ये उत्तरेकडून दक्षिणेकडे आणि वसंत ऋतूत दक्षिणेकडून उत्तरेकडे असते हे सिध्द झालेले आहे. ? याप्रमाणे प्रमुख प्रवासी पक्षी भारतात वायव्य दिशेकडून येतात. तसेच ते लेक बैकल आणि सैबेरियातील अरल समुद्र या दोहोंच्यामध्ये असलेल्या भागातून निघतात. परंतु काही सारस पक्षी मात्र पश्चिम जर्मनीसारख्या दूर देशातून येत असतात.

भारतात येण्याचे दोन मुख्य मार्ग म्हणजे हिमालयातील, ईशान्येकडील आणि वायव्येकडील खिंडीवरून येणारे मार्ग होत. परंतु काही पक्षी वळसा न घालता सरळ हिमालयाच्या रांगा ओलांडून येतात.

**काही प्रयोग**

गेल्या काही वर्षातील प्रयोगांद्वारे असे आढळून आले आहे, की दिवसा स्थलांतर करणारे पक्षी विशिष्ट वेळी सूर्याने पृथ्वीशी केलेल्या कोनावरून दिशा ठरवतात तर निशा-प्रवासी पक्षी ग्रहताऱ्यांवरून मार्ग शोधतात. वरील अनुमाने बरोबर आहेत. कारण स्थलांतराचे वेळी बराच काळ ढगाळ हवामान असल्यास पक्षी मार्ग चुकतात असे लक्षात आले आहे.

खरोखरच पक्ष्यांचे स्थलांतर हा भारावून टाकणारा अभ्यास आहे. पक्ष्यांच्या स्थलांतरविषयक सवयीचे भरपूर शास्त्रीय संशोधन झाले आहे. तसेच त्यांच्या स्थलांतरासंबंधी कौशल्याची आणि तंत्रांची खूपच माहिती उजेडात आली आहे. परंतु एखाद्या पक्ष्याला 'आपली उड्डाणाची वेळ आली आहे' हे सांगणारी जैव-वैज्ञानिक सामग्री किंवा त्याला त्याच हिवाळी मुक्कामावर आणि परत विणीच्या भूमीवर आणणाऱ्या अंतर्गत होकायंत्राविषयी फारच थोडा तपशील उपलब्ध आहे.


काहीही खाणाखुणा नसताना समुद्रावरील मार्ग पक्ष्यांना कसा उमगतो? वर्षानुवर्षे त्याच स्थळी परत येण्याचे त्यांना कसे जमते? छोटे कोकिळ आपल्या पालनकर्त्या माता-पित्यांना सोडण्याच्या अवस्थेत

येण्यापूर्वीच कित्येक आठवडे मोठे कोकिळ भारत आणि आफ्रिकेकडे जायला निघतात. अशा अवस्थेत पूर्वानुभव आणि मार्गदर्शन नसतानाही ते मोठ्या पक्ष्यांना जाऊन कसे मिळतात ? हे आणि असे कित्येक मनोरंजक प्रश्न सोडविण्यासाठी तुमच्या समोर उभे ठाकले आहेत. आजपर्यंत मिळालेली माहिती हिमनगासारखी आहे.

पक्ष्यांच्या स्थलांतरविषयी मूलभूत माहिती आपण घेतली आहे. याशिवाय जागतिक स्थलांतराच्या तीन पद्धती, स्थलांतरी पक्ष्यांचा वेग आणि उड्डाणाची उंची, स्थलांतरविषयी झालेले आधुनिक प्रयोग, असे अनेक मुद्दे या विषयाबाबत मांडता येतील. यथावकाश आपण त्यांचाही विचार करू. पण त्यापूर्वी दोन पत्ते असलेल्या काही दूर देशीच्या पाहुण्यांची ओळख करून घेतल्यास तुम्हालाही त्यांचा शोध घेता येऊन माहिती मिळवता येईल.

**पाऊसकाळ**

मला हिरवा तुतारी भेटतो ही घटना पाऊसकाळातली. हा एकटं राहणं पसंत करणारा पक्षी त्याच्या निवासस्थानात किती एकरूप होतो हे सुरुवातीलाच माझ्या दचकण्यावरून तुम्ही ओळखलं असेल. ह्या पक्ष्याला ओळखण्यासाठी दोन खुणा लक्षात ठेवा. ह्याच्या सफेद शेपटीवर तपकिरी पट्टे असतात मात्र उडत असताना त्याच्या पंखावर कुठलाही पट्टा दिसत नाही. नदीकाठी, ओढ्याकाठी, तळ्याच्या पाळीवर, भाताच्या शेतात, इतकंच कशाला एखाद्या डबक्याजवळसुद्धा हा एकटा जीव तुम्हाला दिसेल. चरत असताना सतत पार्श्वभाग वरखाली हलवायचा ही ह्याच्या इतर भावडांची खोड आहे. याचे दोघे भाऊ म्हणजे वूड आणि स्पॉटेड. हे तीनही पक्षी साधारण लावरीच्या आकाराचे (म्हणजे ७ ते ८ इंच) असून ते पाणपक्षी आहेत. हे तिघेही युरोप आणि उत्तर आशियाचे रहिवासी असले तरी तिसरी जात भारतात गढवाल, काश्मीर आणि कुमाऊँ भागात घरटी करते. रेड शँक आणि ग्रीन शँक या तुतारींच्या पंक्तीतल्या आणि साधारण तशाच सवयी असलेल्या पक्ष्यांची नावे फक्त लक्षात असू द्या. या सर्व पक्ष्यांना इंग्रजीत 'Waders' म्हणतात. (म्हणजे मराठीत चिखलपायटे) उथळ पाण्यात किंवा चिखली भागात हे पक्षी फिरत



कीडे, अळ्या शोधत असतात. शेकाट्या या नावाचा असाच एक 'लंबुटांग्या' आहे. हा पक्षी आपल्याकडे रहिवासी असून ते उत्तर-पश्चिम भारतात घरटी करतात. काही पक्षी दक्षिण, युरोप, अफ्रिका, मध्य व दक्षिण आशियातून हिवाळ्यात स्थलांतर करून भारतात येतात. पुण्याच्या परिसरात हा पक्षी कधी कधी ऑक्टोबर तर कधी त्यापेक्षा लवकर येतो. हा दिसायला छान अन् ओळखायला सोपा आहे. पाठीकडून काळा अन् बाकीचा गोरापान. काडीसारखे, गुलाबी दहा इंच लांबीचे पाय आणि काळी टोकदार चोच. अगदी सहजसाध्य असा हा पक्षी तुम्हाला दुर्बिणीशिवाय सहज ओळखता येईल. दलदल, नदी, गावतळी, मोठे तलाव या ठिकाणी त्याचा मुक्काम असतो.

हिवाळा स्थिरावल्यावर मी जेव्हा पुण्यातील पाषणच्या तळ्यावर जातो तेव्हा ते विविध परदेशी विहंगांनी गजबजून गेललं असतं. डिसेंबरातल्या गुलाबी थंडीत पाठपिशवीत गरम चहाचा थर्मास ठेवावा आणि उबदार कपडे लपटून पाषाण तळ्यावर यावं. गळ्यातली दुर्बीण तलावाकडे रोखावी आणि चित्रविचित्र रंगाच्या गोजिरवाण्या बदकांच्या झुंडीच्या झुंडी पाहून नखशिखांत फुलून जावं. हा आनंद मी अनेकदा लुटला आहे.

उत्तर युरोप, उत्तर आणि मध्य आशिया, पूर्व सैबेरिया या भागातून आलेली थापट्या, सररुचि, चक्रांग, भिवई, राजसरी बदके लक्ष वेधून घेतात.

मनामनातूनि देशभक्तीची ज्योत तेवते एक, देह भिन्न तरि नसानसांतुनि रक्त खेळते एक.

तसेच या बदकांच्या सोबतीनं प्लवा, नंदीमुख, काणूक ही रहिवासी बदकेही विहार करताना आढळून येतात.

कार्यक्षम दुर्बिणीच्या साहाय्याने वारंवार निरीक्षण करून बाह्यरूपांवरून आणि खाद्य सवयींवरून ही बदके आपल्या ओळखीची होऊ शकतात. त्यासाठी सोबत चांगलं पुस्तकही हवं.

बदकांबरोबरच इतर तऱ्हेतऱ्हेच्या पक्ष्यांचा ओघही सतत सुरू असतो. सामान्यपणे चौकस निरीक्षकाच्या नजरेला पक्ष्यांच्या संख्येत झालेला 'उद्रेक' लगेच जाणवतो. स्थानिक आणि प्रवासी पक्ष्यांच्या बेरजेमुळे पक्ष्यांची संख्या दुणावलेली सहज कळते. इतर पक्ष्यांमध्ये सुद्धा पुष्कळ विविधता असते.

**पाषाण तलावावर**

पाषाणच्या तलावावरच युरोप, अफ्रिका आणि आशियातून एक देखणा दलदल हारिण हा शिकारी पक्षी येतो. गडद तपकिरी रंगाचा, वरवर पाहता घारीसारखा दिसणारा हा शिकारी, मांसभक्षक पक्षी पाणगवताच्या पट्ट्यांवरून संथपणे उडत असतो. बदके, पाणकोंबड्या अशा पक्ष्यांची शिकार करण्यात हा तरबेज आहे. जर नशीब चांगले असेल तर पूर्ण हिवाळ्याभरात एकदा तरी मॉंटिग्यूचा हॅरिए या नावाचा दुसरा एक स्थलांतरित हारिण पाषाणला दिसतो.

तलावाच्या पाण्यातून वर उठलेल्या मातीच्या टेंगळावर एक राखट्-पांढऱ्या रंगाचा थोराड बांध्याचा पक्षी कुबड काढून बसलेला दिसेल. वर्षभर दुर्लभ असलेला हा राखी बगळा होय. हा पक्षी भारतातील रहिवासी असून स्थानिक स्वरुपाचं स्थलांतर करतो. यालाच देशांतर्गत स्थलांतर असेही म्हणतात.

चिखल साठलेला तलावाचा पश्चिम भागसुद्धा काही नवीन चेहरे दाखवतो. चिमणी एवढा कंठेरी चिलखा त्याच्या नाजूक पायांची नक्षी उमटवत तुरतुरत असतो. त्याचे पिवळे पाय आणि कंठाभोवतीचा काळा पट्टा त्याची ओळख पटवतात.

थंडीच्या दिवसांत पाषाणच्या तलावावर पक्षी-प्रेमींची झुंबड उडते. अनेक निरीक्षक पाहुण्या पक्ष्यांच्या स्वागतात गुंतलेले असतात. जरा कुठे खुट्ट झालं की, पुण्यातल्या ठराविक कोपऱ्यांवर बातमी वाऱ्यासारखी फिरते. एकदा एक असाच अनाहूत पाहुणा तलावाच्या पश्चिम बाजूवर येऊन उतरला अन् पक्षी निरीक्षकांनी एकच जल्लोष केला. गुलाबी रंगात डबडबलेला हा धाकटा रोहित खरा कच्छच्या रणात घरटी बांधणारा. पण



तो इतक्या दक्षिणेला वाट कसा काय चुकला कुणास ठाऊक? तलावावर त्याची छबी टिपायला आणि दुर्बिणीतून त्याला अंगभर न्याहाळायला त्याच्यापेक्षा कितीतरी पट जास्त माणसंच जमली होती. तो पाषाणच्या तलावावर तात्पुरता थांबा घेण्यासाठी आला होता. म्हणजे भरकटलेला, पक्षी निरीक्षकांनी त्याची नोंद केली.

लुसलुशीत हिरवळीवरसुद्धा गिरक्या घेत भिरभिरणारे अनेक धोबी मजेत बागडत असतात. त्यांच्यामध्येही अनेक प्रकार असतात. हिवाळी पोषाखात त्यांना ओळखणं कठीण जातं. मात्र त्यांच्या सवयींवरून त्यांची ओळख पटू शकते. जवळजवळ सगळे कीटकभक्षक आहेत आणि सारखे शेपट्या हलवत तुरुतुरु फिरत असतात. पाणी सोडून सहसा दूर जात नाहीत. रात्री निजण्यासाठी मात्र एखाद्या उसाच्या शेतात थव्यांनी येऊन उतरतात.

पुण्यात स्थलांतरीत पक्ष्यांच्या अभ्यासाठी मुळा-मुठा पक्षी अभयप्रदेश, पाषाण ही आदर्श ठिकाणे आहेत. तसेच पक्षी निरीक्षकांनी भ्रमंती करून उजेडात आणलेली काही स्थळे म्हणजे पुणे-सोलापूर रस्त्यावरील कवडी हा नदीकाठ. पाटस, वरवंड, शिरसुफळ, खामगाव, भिगवण हे छोटे मोठे तलाव आणि धरणांचे पाणपसारे.

प्रातिनिधीक पक्षी म्हणून वर उल्लेखिलेल्या काही पक्ष्यांशिवाय पुणे

आणि परिसरात वेगवेगळ्या जातींचे स्थलांतरीत पक्षी येतात. कृष्ण क्रौंच, रोहित, करकोचे, राजहंस, गरुड, ससाणे, साळुंक्या, भोरड्या, सुगरणी आणि इतरही काही पक्षी ऋतुमान आणि गरजेनुसार स्थानिक अथवा हिवाळी स्थलांतर करून येतात.

**स्थानिक स्थलांतर**

हिवाळ्यातील व्यापक हालचालींबरोबरच स्थानिक पक्ष्यांमध्येसुद्धा स्थानांतराचे चढउतार दिसून येतात. स्थानिक भौगोलिक आणि उष्णतामान, अवर्षण, पूर परिस्थिती, खाद्य पदार्थांची उपलब्धता, काही विशिष्ट वनस्पतींचा फुलारण्याचा काळ, फळे धरण्याचा काळ, कीटकांची कमी-जास्त होणारी संख्या, या गोष्टी अशा प्रकारच्या स्थलांतरास कारणीभूत ठरतात. पुढील काही उदाहरणे निरीक्षणांनी डोळ्यांपुढे येतात-ः शैलकस्तूर, स्वर्गीय नर्तक, हळद्या.

या पंखवाल्या पाहुण्या-रावळ्यांची दखल घेत असताना, म्हणता म्हणता होळीच्या धगाट्यात थंडी गडप होते. एक एक पाखरू आंतरिक प्रेरणेने उत्तरेच्या निर्गमनासाठी भरारतं. पक्षीनामांच्या याद्या थोट्या दिसू लागतात. पाषाणाच्या तलावावरच मार्च महिन्याच्या शेवटी मी येतो-

''तरारलेल्या शेपट्यांची सररुची बदकं अगदी एखाद्या चित्रासारखी दिसतात. तांबूस-चॉकलेटी पोटांची, गर्द हिरव्या मानांची शॉव्हेलर, जोडी-जोडीने किंवा तीन-चाराच्या थव्यात कुठेतरी थबकलेली असतात. उथळ पाणी आणि किड्यांच्या शोधात शेकाटे थेट रामनदी तलावाच्या संगमावर पोहोचलेले दिसतात. एखादं भिवई आपल्याकडे बघत बघत तलावाच्या काठाकडे सुखरूप हळूहळू सरकत जातं.

रंगीबेरंगी विणीचे पोषाख चढवून सारी स्थलांतरित बदके कावऱ्या-बावऱ्या नजरांनी निळ्या आभाळाकडे पाहात उगाचच कुठेतरी थबकून राहिलेली असतात. खाण्या-पिण्याकडे त्यांचं मन लागत नाही. आता उगवती पूर्वा आणि मावळती प्राची त्यांना खुणावत असते. जराशा आवाजाने तात्काळ हवेत झेपावण्याकडे त्यांचा कल असतो. पाषाण तलाव ते मुळा-मुठा अभयारण्य, अशा त्यांच्या उड्डाणाच्या चाचण्या नित्यनेमाने सुरू असतात. तलावावर एखादी घिरटी घालून, माना ताणून, हवा कापत वेगाने निघालेला एखादा थवा जेव्हा मी पाहतो तेव्हा, नकळत डोळ्यांच्या कडा पाणावतात. वाटंत, ही गोजिरवाणी बदकं नसलेलं तळं आता आपल्याला पाहावं लागणार आहे. पश्चिम वाऱ्याबरोबर उडणाऱ्या जललहरींवर हेलकावे खात तरंगणारी ही बदकं आता निघून जातील. या विचाराने मला गलबलून आलं. चार टेकड्यांमध्ये सूर्यप्रकाशात तळपणारं तळ रिकाम होईल उत्तरेकडे पाहूणे शोधूनसुद्धा सापडणार नाहीत. एखादी जांभळी पाणकोंबडी लोंबत्या पायांवर जडपणे फडफड करताना दिसेल.

**- संदर्भ ग्रंथ-**


१) द बुक ऑफ इंडियन बर्डस
डॉ. सालीम अली.

२) द वर्ल्ड ॲटलास ऑफ बर्डस

३) लेखातील सर्व चित्रे-
'लाईफ नेचर लायब्ररी, द बर्डस्'


●●●


**श्री. किरण पुरंदरे**
६२/अ, प्रशांत, एरंडवणा
गावठाण,पुणे ४.


## *हसा हसा*

### *खरे बोलणे*

*न्यायालयात एका कैद्याची सुनावणी सुरु असते. न्यायाधीश विचारतात, ''तू तुझ्या अधिकाऱ्याला मुर्ख, पाजी असे अपशब्द का वापरलेस ?''*

*कैदी - मी अपशब्द नाही वापरले. मी फक्त आज्ञेचे पालन केले.*

*न्यायाधीश - अपशब्द वापरून आज्ञेचे पालन कसे होईल?*

*कैदी - न्यायाधीश महाराज माझ्या अधिकाऱ्याने मला विचारले, ''तू मला काय समजतोस ? ते खरं सांग'' आणि मी त्याला खरे उत्तर दिले.*

### *सोबत*

*दिनू सायंकाळी आपल्याला टॉमीला घेऊन फिरायला निघाला तेव्हा एक टवाळखोर मुलगा म्हणाला, ''अरे, या गाढवाच्या सोबत कुठे फिरतोस?''*

*चिडून दिनू म्हणाला, ''हा गाढव नाही, कुत्रा आहे.''*

*तेव्हा तो मुलगा परत निष्क्रिलपणे म्हणाला, ''पण मी हे कुत्र्याला विचारले होते.''*




**डॉ. प्रकाश जोगळेकर**

भूतकाळातील घटना-व्यक्ती यांची स्मृती जपून ठेवण्यासाठी बरेचदा कॅमेऱ्याची गरज आपल्याला भासते. अनेकदा काही घटना अशा असतात की ज्या जपून ठेवाव्याशा वाटतातत. प्रत्यक्षात घटना जपणे अवघड असते; पण अशा घटना कॅमेऱ्यात टिपून घेणे सहज शक्य असते. प्रकाशचित्रांच्या माध्यमातून जपलेल्या अशा अनेक हळुवार स्मृती आपल्या धावपळीच्या जीवनात आनंद देत असतात. मात्र प्रकाशचित्रे ही आपण अनेक कारणांसाठी वापरतो. त्यातील एक भाग आनंदासाठी! त्याच बरोबर व्यवसाय, वर्तमानपत्रे, मासिक, जाहिराती, अनेक ठिकाणी लागणारी ओळखपत्रे इ. ठिकाणी प्रकाशचित्रांची गरज लागते. प्रत्येक प्रकाशचित्र तांत्रिकदृष्ट्या शक्यतो निर्दोष असावं, हे जरी खरं असलं तरी ही बाबचं नेहमी महत्त्वाची नसते. क्रिकेटच्या एखाद्या सामन्यात अंतिम क्षणी खेळाडूने मारलेला विजयी फटका, एखादी अपघाताची घटना, अशा वेळी तो क्षण टिपणे याला प्राधान्य असते. एखादा दुर्मिळ पक्षी दिसला तर तो उडून जाण्यापूर्वीच चटकन त्याचे प्रकाशचित्र टिपणे महत्त्वाचे असते.

पूर्वी कॅमेरा ही दुर्मिळ वस्तू होती. आज घराघरातून कॅमेरे आहेत. वाढदिवस, उत्सव, लग्नासारखे समारंभ, सहल अशा प्रसंगी आपण उत्साहाने प्रकाशचित्रे काढत असतो. त्यासाठी भरपूर खर्चही करतो. परंतु बऱ्याचदा फारसा विचार न करता, उत्साहाच्या भरात प्रकाशचित्रे काढली जातात. मात्र थोड्या प्रयत्नांनी जास्त चांगली प्रकाशचित्रे काढणे सहज शक्य आहे.

त्यासाठी आपली स्वतःची व कॅमेऱ्याची कुवत, यांची सांगड घालणे महत्त्वाचे असते. प्रकाशचित्र उत्तम येण्याच्या दृष्टीने कोणकोणत्या गोष्टी आवश्यक आहेत हे प्रथम जाणून घेऊया.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रकाशयोजना! बाहेर चित्रण करताना शक्यतो सूर्याकडे आपली पाठ असावी. प्रकाशाच्याविरुद्ध चित्रण करू नये. हे लक्षात ठेवल्यास चित्रे सुस्पष्ट येतील, तरीही उत्तम प्रकाशचित्रकार एखादा क्षण टिपताना प्रकाशाच्या विरुद्ध दिशेनेही सुंदर प्रकाशचित्रण करू शकतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे, मलपृष्ठाच्या आतील पानावरील, आजोबा व नातू यांचे प्रकाशचित्र. निसर्गाच्या सान्निध्यात ते दोघे एकमेकांच्यात रंगून गेलेले दिसत आहेत. दोघांच्याही चेहऱ्यावरील भाव छान टिपले गेले आहेत. नातवाला काही सांगण्यासाठी, शिकवण्यासाठी आजोबांनी जागाही छान निवडली आहे. पाठीमागचा निसर्ग आणि या दोन व्यक्तिरेखा यांचा एकसंध परिणाम या सुंदर प्रकाशचित्रातून आपल्यापर्यंत पोहोचतो. सध्या फ्लॅशसहित असणारे जे ऑटो-कॅमेरे आहेत, त्यांच्या साह्याने अंधारात किंवा खोलीत साधारण ७-८ फुटांपर्यंतचे फोटो चांगले येतात. त्याहून लाबंचे काळे येतात.

प्रकाशयोजनेप्रमाणेच, चित्राची पार्श्वभूमीही महत्त्वाची. उदा. एखाद्या व्यक्तीचे प्रकाशचित्र काढताना, खांब,



व्यक्तित्वाच्या उल्लंघुनिया साऱ्या आकुंचित सीमा, विशालहृदयी स्थापन करू या समाजपुरुषाची प्रतिमा.

झाडे, ड्रेनेजच्या नळ्या इ. मधे येत नाही ना? हे पाहणे महत्त्वाचे, समारंभाची प्रकाशचित्रे काढताना, योग्य जागी उभे राहून फोटो काढणे, चित्रण करणे महत्त्वाचे. तसेच त्या समारंभाची माहिती असणे महत्त्वाचे असते. लग्नात हार घालणे, घास देणे, मुंजीत भिक्षावळ, असे क्षण टिपणे महत्त्वाचे. याचे दुसरे उदाहरण म्हणजे, आपणास एखाद्या कोळ्याचे प्रकाशचित्र काढायचे असेल तर पार्श्वभूमीवर समुद्र, होडी, जाळे, किनाऱ्यावरील नारळाची झाडे, झोपड्या असतील तर चित्रण कृत्रिम वाटत नाही. एखाद्या आदिवासीचे प्रकाशचित्र घ्यायचे असेल तर त्याचा वेश, त्याची झोपडी जंगलाची पार्श्वभूमी या सर्वांमुळे प्रकाशचित्र जिवंत वाटते.

व्यक्तिप्रमाणेच प्राणी, पक्षी, यांचे चित्रण हा वेगळाच विषय. त्यासाठी टेलिफोटो लेन्स लागते. त्या पक्ष्यांच्या, प्राण्यांच्या सवयींची माहिती लागते. आपली चाहूल त्यांना लागणार नाही याची कितीही काळजी घेतली तरी अपेक्षित प्रकाशचित्र मिळण्याआधी बरीच प्रकाशचित्रे वाया जातात. त्यासाठी चिकाटी हवी. हा वि षय लवकर आत्मसात होणार नाही. परंतु आपल्या नेहमीच्या पाहण्यात असणारे, कावळे, चिमण्या, कबुतरे, कुत्री, मांजर आपण सहज चित्रित करू शकू. हे चित्रण करताना तुम्ही तुमच्या कल्पना शक्तीचा मुक्त वापर करू शकता. मलपृष्ठाच्या आतील पानावरील मांजराच्या पिल्लांच्या प्रकाशचित्रांची मालिका नीट पाहा. त्यातून एक चित्रकथा मी तुमच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. पहिल्या चित्रात आपण मांजरीची गोंडस पिल्ले उत्साहाने पाळतो हा प्रसंग आहे. दुसऱ्या चित्रात त्यांना मायेने खाऊ घालायचा प्रयत्न करतो. पण ती पिल्लं त्रासही देतात हे लक्षात आल्यावर त्यांना बाहेर सोडतो, हे तिसऱ्या चित्रात दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून मांजराच्या छोट्या पिल्लांचा गोंडसपणा तर आपले मन मोहवून टाकतोच पण त्याच बरोबर यात मानवी स्वभावाचे चित्रणही नकळत केले आहे. तुम्हीसुद्धा अशा अनेक चित्रकथा तयार करू शकाल. वॉल्ट डिस्ने सगळ्यांना होता येत नाही हे मान्य. पण याचा अर्थ आपण आपले प्रयत्न सोडावे असं मात्र नाही.

आपल्याकडे जो कॅमेरा आहे त्याची क्षमता काय आहे? व त्याच्या साहाय्याने काय काय करणे शक्य आहे हे नीट शिकून घ्यावे. आपण काढलेली प्रकाशचित्रे दुसऱ्यांना दाखवावीत, त्यांच्या सूचना समजावून घ्याव्यात, तसेच दुसऱ्याने काढलेली प्रकाशचित्रेही पाहावीत. त्यामुळे आपली 'नजर' तयार होण्यास मदत होते. अनेक विषय सुचतात, कसे हाताळावे ते समजते. चुकाही हळूहळू समजू लागतात. त्यासाठी एखाद्या जाणकाराबरोबर प्रदर्शने बघणे, याचा उपयोग होऊ शकतो. दादसुद्धा कशी आणि कधी द्यावी, हे समजायला लागते.

प्रकाशचित्रणांचा संग्रह करताना प्रकाशचित्राखाली तारीख, ठिकाण, वेळ ह्याची नोंद करावी. आपल्या मार्मिक प्रतिक्रिया मोजक्या शब्दात लिहून ठेवल्या तर चांगल्या आठवणी आपण बंदिस्त करू शकतो. एखाद्या सहलीला आपण गेलेलो असू तर त्यातील सहप्रवाशांना एखादे चित्र भेटकार्ड रूपाने पाठवता येईल. त्यामुळे जुन्या आठवणींना उजाळा मिळेल व एक वेगळाच आनंद मिळेल.

आपण जी प्रकाशचित्रे काढतो ती नीट जपून ठेवावीत. अशीच काही वर्षे जातात. आपला साठा वाढत जातो. घरातील माणसे, जुने मित्र असे एकच बसून ही प्रकाशचित्र पाहतो ती मजा औरच. कालांतराने काहीजण लांब परदेशी जातात, काही मृत्यू पावतात, त्यांच्या चांगल्या आठवणी आपल्या कॅमेऱ्याने बंदिस्त करता येतात. त्यासाठी पहिल्यापासून थोडे नियोजन हवे.

'कॅमेऱ्याशी हितगुज' नावाने मी प्रकाशचित्रणावर छोटे पुस्तक लिहिले आहे. कॅमेरा निर्जीव असतो. तो आपण 'सजीव' कसा करावयाचा हे थोडे लिहिण्याचा त्यात प्रयत्न केला आहे. त्यातील सूचना लक्षात घेऊन प्रकाशचित्रण केल्यास सरावाने सजीव वाटणारी सुंदर प्रकाशचित्रे काढता येणे शक्य आहे. किंमत मुद्दाम कमी ठेवली आहे. एका फिल्महून कमी. जमल्यास पुस्तक मिळवून अवश्य वाचा. वाचत असताना काही शंका आल्यास त्या कळवा. तुमच्या शंकांची उत्तरे देण्यास आनंदच वाटेल.

●●●

**डॉ. प्रकाश जोगळेकर**
७४०, नवी बुधवार पेठ, पुणे २

व्यक्तित्वाच्या सीमा विरुनी समाजजीवन नित्य फुलावे, समर्पणाच्या कल्पतरुला नव उर्मीचे मोहर यावे.

जरूर पाहावे असे काही

# 'बेन - हर'

प्रा. नीलिमा करमरकर

मित्रांनो, 'टायटॅनिक' या चित्रपटला ११ ऑस्कर ॲवार्डस् मिळाल्याचे तुम्हाला माहीत आहेच. हॉलिवूड या अमेरिकेतील चित्रपटनगरीत दिले जाणारे हे पुरस्कार म्हणजे चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च सन्मान समजला जातो. आज चित्रपट अधिकाधिक तांत्रिक करामतींचा वापर करून निर्माण केले जातात. तथापि ३९ वर्षापूर्वी म्हणजेच १९५९ या वर्षीसुद्धा एका चित्रपटाने ११ ऑस्कर मिळवून चित्रपट जगतात धमाल उडवून दिली होती. हा गाजलेला, बहुचर्चित, भव्यदिव्य चित्रपट होता 'बेन-हर'! ली वॅलेस नामक लेखकाच्या मूळ कादंबरीवर याच नावाने १९२५ साली मूकपट काढण्यात आला. बोलपटांचे युग सुरू झाल्यावर लेखक कार्ल टर्नबर्ग आणि त्याच्या सहकाऱ्यांनी पटकथा लिहिली व 'मेट्रो गोल्डविन मेयर' या सुप्रसिद्ध कंपनीने नेहमीच्या दिमाखात 'बेन-हर' हा बोलपट वितरीत केला. 'विल्यम वाइनर' या कुशल दिग्दर्शकाचा परिसस्पर्श या चित्रपटाला झाला आहे, असे म्हटले जाते. आहे तरी काय एवढे या चित्रपटात? असा प्रश्न तुम्हा सर्वांच्याच मनात उद्भवला असेल.

या चित्रपटाची काल्पनिक कथा घडते, ऑगस्टस् सीझर या रोमन सम्राटाच्या कारकीर्दीत! जेरूसलेम शहरात 'ज्यूडाह बेन-हर' नावाचा शूर ज्यू राजपुत्र राहात असतो. त्याचा एक बालमित्र असतो 'मेसाला', परंतु मोठेपणी या दोघांमधे तेढ निर्माण होते. कारण रोमन व ज्यू यांच्यात वादंग सुरू असतात. ज्यू बेन-हर व त्याची आई आणि बहीण यांना त्यांच्या हातून अजाणतेपणी घडलेल्या क्षुल्लक चुकीमुळे तुरुंगात डांबण्यात येते. हे विश्वासघाती कृत्य करण्यात 'मेसाला' याचा हात असतो. बेन-हरच्या आयुष्याचे भयावह नवीन पर्व सुरू होते.

चार्लटन हेस्टन या नटाने बेन-हर या नायकाच्या भूमिकेत खरोखर जीव ओतला आहे. प्रथम रुबाबदार राजपुत्र, नंतर जहाजावरील हालअपेष्टांतील गुलाम, नंतर रोमन सम्राटाच्या दरबारात सन्मान मिळूनही स्वतः ज्यू असल्याचा अभिमान बाळगून कुटुंबाच्या शोधार्थ बाहेर पडलेला तरुण, रथांच्या जीवघेण्या शर्यतीतील 'मेसाला' वर मात करणारा खंदा लढवय्या, एस्थर या प्रेयसीचा उमदा व दिलदार प्रियकर अशा बहुविध भूमिका हा नट जगला आहे.

बेन-हर आणि इतर गुलामांचे रोमन शिपायांनी केलेले हाल, गुलामांना पशुसमवेत दिली जाणारी पशुतुल्य वागणूक, अथांग सागरातून मार्गक्रमण करणाऱ्या जहाजांना यंत्रवत वल्हवणारे गुलाम, ढोल बडवणारे आणि त्या लयीत वल्हे मारणाऱ्या गुलामांना फटके मारणारे नराधम रोमन सैनिक अशी काही दृश्ये आणि प्रसंग प्रेक्षकांच्या मनावर कायमचे ठसतात. असेच एकदा समुद्रावरील लढाईत बेन-हर आपल्या तलवारबाजीने 'एरियस' या आरमार प्रमुखाचा जीव वाचवतो. त्यामुळे एरियस बेन-हरवर खुश होऊन त्याला गुलामीतून मुक्त करतो. इतकंच नव्हे तर त्याला आपला दत्तकपुत्र घोषित करतो. इथे बेन-हरच्या आयुष्याला नवीनच कलाटणी मिळते. या लढाईत रोमन जिंकतात. या दोघा विजयी वीरांची रोममधील प्रवेशाची मिरवणूक म्हणजे, रोमन वैभवाचे एक उदाहरण ठरते. राजवाड्यांचे

अप्रतिम सेटस्, शेकडो अरबी घोडे, हजारो शस्त्रधारी सैनिक आणि एका सुसज्ज रथावर आरुढ विजयीवीर बेन-हर आणि अेरियस! ७० एम.एम.च्या मोठ्या पडद्यावरील ही शोभायात्रा डोळ्यांचे पारणे फेडते. रोममधील वैभवशाली वातावणात बेन-हरचे मन रमत नाही. ज्यूंवरील अन्यायाची चीड मनात असते, निरपराध जन्मदात्री आई व बहीण यांचा शोध घ्यायचा असतो. रोम येथील वास्तव्यात बेन-हर रथ चालवण्याचे कौशल्य आत्मसात करतो. रोमन चालीरितींशी परिचित होतो. 'शेख इद्रीम' या अरबी घोड्यांच्या व्यापाऱ्याशी त्याची मैत्री होते. हाच इद्रीम पुढे त्याला रथशर्यतीत भाग घेण्यास प्रवृत्त करतो व त्यासाठी आपले पुत्रवत निगा ठेवलेले अरबी घोडे रथाला जोडण्यास देतो. शेख इद्रीमची स्वभावाचे विविध पैलू दाखवणारी भूमिका चित्रपटात भाव खाऊन जाते. ग्रिफित या नटाने या भूमिकेसाठी सर्वोत्तम सह-कलाकराचे ऑस्कर पटकावले आहे.

बेन-हर आपल्या गावी परत येतो. व 'मेसाला' ने आपल्या आई व बहिणीस मारले असे समजून, त्याचा सूड घेण्यासाठी रथांच्या शर्यतीत भाग घेतो. रथपर्यत हा चित्रपटाचा सर्वार्थाने परमोच्च बिंदू आहे. या रथशर्यतीत प्रमुख प्रतिस्पर्धी दोनच असतात. बेन-हर आणि खलनायक मेसाला! ही रथशर्यत सलग ४० मिनिटे चित्रपटात आहे. शर्यतीसाठी तयार केलेला मैदानाचा आखाडा, हजारो प्रेक्षक, राजघराण्यातील मानकरी, घोषणा व प्रोत्साहनपर आरोळ्यांनी दुमदुमून गेलेले मैदान, वाऱ्याच्या वेगाने रथ हाकणारे प्रतिस्पर्धी, स्वतःच्या रथचक्राला दातेरी, धारदार वेगळे चाक बसवून घातपाताचा प्रयत्न करणारा मेसाला हे सर्व दाखवताना 'याकीमा' या कलादिग्दर्शकाच्या कॅमेऱ्याने नेत्रदीपक कामगिरी केली आहे. उत्कृष्ट पार्श्वसंगीत व ध्वनियंत्रणा यामुळे योग्य तो परिणाम साधला गेला आहे. अंगावर काटा उभा करणारी ही रथशर्यत बघण्यासाठी तरी हा चित्रपट पाहायला हवा.

अर्थातच या शर्यतीत बेन-हर जिंकतो. मेसाला स्वतःच्या रथाच्या चाकामुळेच जखमी होतो. मरणोन्मुख अवस्थेत तो बेन-हरला त्याची आई व बहीण जिवंत असल्याची व त्या कुष्ठरोगाने ग्रासल्याची बातमी देतो. त्यानंतर अनेक छोटेमोठे प्रसंग घडतात व बेन-हरला त्याची प्रयेसी 'एस्थर' भेटते. तिच्या साहाय्याने तो आपली आई व बहीण यांचा शोध लावतो. येशू ख्रिस्ताची कृपा व काही दैवी चमत्कार घडून त्या रोगमुक्त होतात व शेवटी सर्वजण एकत्र भेटतात. अशा प्रकारे



धर्म, कर्म अन् कर्तव्याने रक्षण केले भूमातेचे, तव शौर्याने पुन्हा रंगु दे पान नवे रे इतिहासाचे.

ऐतिहासिक वाटणाऱ्या या कथेला काहीसे धार्मिक दाखले देऊन वेगळीच डूब दिली आहे.

हा इंग्रजी चित्रपट ३ तास ३२ मिनिटांचा असूनही अजिबात कंटाळवाणा होत नाही. इंग्रजी भाषा व कथानक सहजपणे समजते व पुढे काय होईल? याची उत्सुकता सतत मनात राहते. बेन-हर चित्रपटाचे सर्व चित्रीकरण रोम येथील 'सिनेसिटा' स्टुडिओत केवळ सात महिन्यांच्या कालावधीत पूर्ण केले गेले. इटलीमधे त्यावेळी हॉलीवूडचे चित्रतारे व तारका वास्तव्यासाठीच अवतीर्ण झाले होते. बेन-हरची भूमिका करणाऱ्या चार्लटन हेस्टनला भालाफेक, रथ चालवणे, तलवारीचे द्वंद्व याचे विशेष प्रशिक्षण अनेक दिवस द्यावे लागले. शरीर पिळदार दिसावे यासाठी विशेषप्रयत्न करावे लागले. स्टुडिओत पाण्याचे प्रचंड तलाव तयार करून त्यात जहाजबांधणी केली गेली. रथ तयार करण्याचे काम अहोरात्र अनेक कारागीर करत होते. रोमन पद्धतीचे पोशाख, दागिने तयार करण्यासाठी कपडेपटातील मंडळी झटत होती. हजारो इटालियन 'एक्स्ट्राज'स्टूडिओत तैनात केले होते. इटलीतील उन्हाळ्यात 'ओरियस' सारख्या आरमारी मंडळींना पन्नास पौंड वजनाची चिलखते अंगावर चढवून चित्रीकरण करावे लागत होते. दिग्दर्शक विल्यम वाइलर याने 'आय ॲम अ ज्यू'या, नायकाच्या तोंडी आलेल्या एका वाक्यसाठी, सोळा 'रिटेक्स' घ्यायला लावले. यामधे मोशन पिक्चर कॅमेऱ्याचा यथार्थ उपयोग केला गेला. मेट्रो गोल्डविन मेयर कंपनीची तिजोरी अक्षरशः रिकामी झाली. अर्थात चित्रपटाने उत्तुंग यश प्राप्त केल्यावर कित्येक पटींनी भरपाई झाली ती वेगळीच. एस्थर या प्रेयसीची छोटीशी भूमिका करणारी इस्रायली नटी हेया हॅरिअर हिचा हा पहिलाच अमेरिकन चित्रपट. पण त्यामुळे ती एकदम प्रसिद्धीच्या शिखरावर गेली.

तर असा हा चित्रपट बेन-हर! यात आपल्याला दिसून येतात आई, मुलगा व बहीण यांचे कौटुंबिक जिव्हाळ्याचे संबंध, पूर्वजीवनात गुलाम असलेली नायिका एस्थर व बेन-हर यांचे भावविश्व, अेरियस याने आपला जीव वाचवणाऱ्या बेन-हरला गुलामीतून मुक्त करण्यासाठी केलेले प्रयत्न, रोमन साम्राज्यातील अन्याय, गुलामगिरीची जीवघेणी पद्धत, 'मेसाला' व बेन-हर यांमधील सूडनृत्य, येशूला क्रूसावर चढवितानाचा भयंकर प्रसंग, येशूच्या कृपाप्रसादाने झालेला दैवी चमत्कार आणि अर्थातच सर्व संकटातून तावून सुलाखून बाहेर पडलेला, स्वतःच्या देशाधर्माचा अभिमान बाळगून अन्यायाचा प्रतिकार करणारा नायक बेन-हर!

जगभरच्या प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलेल्या बेन-हरचे यश या चित्रपटाचा निर्माता 'सॅम झिंबालिस्ट' हा पाहू शकला नाही. चित्रपट पूर्ण होण्यास तीन चार दिवसच बाकी राहिले होते. त्यावेळी सेटवरच हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन, बोलता बोलता सॅमचे प्राणोत्क्रमण झाले. सर्वांनाच हा तीव्र धक्का होता. तरी सुद्धा दुसऱ्या दिवशी सॅमसाठी फक्त दहा मिनिटे दुखवटा व्यक्त करून, नेहमीप्रमाणे कामाला सुरुवात झाली व ठरलेल्या वेळी चित्रपट पूर्ण होऊन प्रदर्शित झाला. एका निर्मात्याला सहकाऱ्यांनी वाहिलेल्या श्रद्धांजलीचे याहून बोलके उदाहरण असेल काय?

●●●

**प्रा. नीलिमा करमरकर**
बी/६, 'शशिकिरण',
अशोक पथ, पुणे ४


# ओळख भारतरत्न पुरस्कारांची

**सौ. वर्षा कुलकर्णी**

१९४७ साली देश स्वतंत्र झाला आणि पं. नेहरूंनी स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला. विविध भाषा, लोकजीवन, परंपरा, इतिहास लाभलेल्या भारताची संस्कृती अनेक राजे, संत, शास्त्री-पंडित, शास्त्रज्ञ, समाजसेवक यांनी समृद्ध करून ठेवली आहे. हा वारसा जतन करून अधिक समृद्ध करणे, हे आपल्या सरकारचे प्रथम कर्तव्य असल्याचे पं. नेहरूंनी जाणले. त्यासाठी त्यांनी पंचवार्षिक योजना आखल्या. संगीत, साहित्य, कला अकादमी उभारल्या. याच काळात भारताच्या सर्वांगीण विकासाठी कार्यरत असणाऱ्या नागरिकांचा गौरव करण्याच्या दृष्टीतून शौर्य पदके, सेवा पदके, अर्जुन पुरस्कार, नागरी पुरस्कार देण्यास सुरुवात झाली.

नागरी पुरस्कारात 'भारतरत्न' व 'पद्म पुरस्कार' असे दोन भाग आहेत. पद्म पुरस्कारात, पद्मविभूषण पद्मभूषण व पद्मश्री असे तीन क्रम आहेत. मात्र या पुरस्कारात 'भारतरत्न'हा सर्वोच्च मानाचा शासकीय नागरी पुरस्कार मानला जातो. आज आपण या 'भारतरत्न' पुरस्काराची अधिक माहिती जाणून घेऊया.

शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, विज्ञान, कला या क्षेत्रात बहुमोल कामगिरी करणाऱ्या श्रेष्ठ भारतीयास हा सर्वोच्च नागरी पुरस्कार दिला जातो. राष्ट्रपतींच्या हस्ते एका खास समारंभात हा पुरस्कार प्रदान केला जातो. साधारणपणे 'प्रजासत्ताक दिनी' म्हणजे २६ जानेवारीला हे पुरस्कार जाहीर होतात. या पुरस्कारांसाठी वेगवेगळ्या स्तरावरील समित्यांकडून योग्य त्या व्यक्तींची निवड केली जाते. राज्य सरकारेही व्यक्तींच्या नावाची राष्ट्रपतींकडे शिफारस करू शकतात. अर्थात दरवर्षी हा पुरस्कार दिला जातोच असे नाही. तसेच एखाद्या वर्षी एकापेक्षा जास्त व्यक्तींची निवडही या पुरस्कारासाठी केली जाते. जात-धर्म, स्त्री-पुरुष असा भेद न करता, त्या व्यक्तीची गुणवत्ता व अजोड कार्य या निकषांवर या पुरस्कारासाठी व्यक्तींची निवड केली जाते.



१९५४ पासून भारत सरकारने हा सर्वोच्च पुरस्कार सुरू केला. पहिल्याच वर्षी, आधुनिक विज्ञानाचे जनक डॉ.सी.व्ही. रामन यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. त्याच वर्षी चक्रवर्ती राजगोपालाचारी व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनाही हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. भारतीय अभियांत्रिकी क्षेत्रातील अत्युच्च मानदंड सर विश्वेश्वरय्या यांना १९५५ मध्ये या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आत्तापर्यंत पाच पंतप्रधान, चार राष्ट्रपती यांच्यासह ३७ व्यक्तींना या पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. नऊ जणांना मरणोत्तर हा पुरस्कार देण्यात आला आहे, तर सरहद्द गांधी, नेल्सन मंडेला यांच्यासारख्या अभारतीय व्यक्तीनाही हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. १९८० साली या पुरस्काराने गौरवित झालेल्या मदर तेरेसा या जन्माने युगोस्लाव्हियन असल्या तरी त्यांनी भारतीय नागरिकत्व स्वीकारले होते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, चक्रवर्ती राजगोपालाचारी, डॉ. चंद्रशेखर व्यंकटरामन यांच्यासारख्या विद्वान व्यक्तिंप्रमाणेच पं. नेहरू, इंदिरा गांधी व राजीव गांधी या एकाच घरातील तीन व्यक्तींनाही हा पुरस्कार बहाल करण्यात आला. १९९१-९२ साली सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मौलाना आझाद, नेताजी सुभाषचंद्र बोस यांना मरणोत्तर हा पुरस्कार देण्यात आला. १९९२ साली प्रसिद्ध उद्योगपती जे. आर.डी.टाटा, सुप्रसिद्ध दिग्दर्शक सत्यजित रे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

१९९२ च्या पुरस्कारानंतर १९९५ पर्यंत कोर्टातून या पुरस्कारांना स्थगिती आली. त्यामुळे मधल्या काळात हा पुरस्कार कुणाला देण्यात आला नव्हता. मात्र १९९५ मध्ये ही स्थगिती उठल्यानंतर १९९७ मध्ये माजी पंतप्रधान व राजकीय नेते गुलझारीलाल नंदा, स्वातंत्र्यसैनिका अरुणा असफअली, प्रसिद्ध तंत्रज्ञ अब्दुल कलाम यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दक्षिणेतील सुप्रसिद्ध गायिका एम. एस. सुब्बालक्ष्मी आणि राजकीय नेते सी. सुब्रमण्यम् यांना १९९८ चा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याच वर्षी लोकनायक जयप्रकाश नारायण यांना नुकताच मरणोत्तर हा पुरस्कार जाहीर करण्यात आला.

राष्ट्रपतींच्या हस्ते देण्यात येणारा हा पुरस्कार म्हणजे तांबं या धातूमध्ये घडविले पिंपळाचे पान असते. सूर्य प्रतिमा आणि 'भारतरत्न'हे या पुरस्काराचे नाव हिंदीमधे त्या पिंपळाच्या पानातच कोरलेले असते मागील बाजूस राजमुद्रा असते. आकर्षक अशा रंगीत मखमली पेटीतून हा किताब राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मानपूर्वक बहाल करण्यात येतो.

फक्त स्वतःच्याच घरादाराची पर्वा न करता, स्वातंत्र्य, समता बंधुभाव ही तत्त्वे अंगीकारून, देशासाठी आपले उभे आयुष्य वेचणाऱ्या आणि खऱ्या अर्थाने भारताचे 'रत्न' असणाऱ्या या व्यक्तींच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपल्याला नक्कीच खूप काही शिकण्यासारखे आहे. (श्री. मोहन जोशी यांच्या 'भारत रत्न' या पुस्तकाच्या आधारे)

●●●

**सौ. वर्षा कुलकर्णी**
२२ अ, मैफल, ९१/३ शिक्षकनगर
कोथरुड, पुणे ३८

इतिहासाची सुवर्णपाने हिंदुरसाने भरलेली, जीवनमूल्ये दिव्य चिरंतन त्याग तपाने अवतरली.

# त्वरित फाशी द्यावं

श्रीमती नयनतारा देसाई



कर्तारसिंग सराभा पदवीधर झाला. घरच्या मंडळींनी त्याला पुढील शिक्षणासाठी अमेरिकेत पाठवलं. तो तिथं येताच कस्टम अधिकाऱ्यानं त्याच्या सामानाची तपासणी करताना प्रश्न केला,

''मि. कर्तारसिंग, तुला अमेरिकेत प्रवेश दिला नाही तर?''

''सर, असं केलं तर माझ्यावर अन्याय होईल. इथं शिक्षण प्राप्त करून माझ्या देशाच्या प्रगतीसाठी काहीतरी चांगलं काम करीन.''

''असं म्हणसोस?''

''खरंच सांगतो. मला प्रवेश नाकारलात तर माझ्या देशाचं अपरिमित नुकसान होईल.''

त्याच्या तेजस्वी उत्तरानं प्रभावित होऊन अधिकारी त्याच्याकडं पाहातच राहिला. कर्तार अतिशय देखणा होता. त्याची देहयष्टी अतिशय सृदृढ होती, नेत्रात प्रखर तेज होतं. त्याचं उत्तरही स्वाभिमानी आणि देशप्रेमानं ओथंबलेलं होतं. त्या अधिकाऱ्यानं त्याला आत्यंतिक खुशीनं प्रवेश दिला. त्याचे आभार मानून तो कॉलेजात दाखल झाला. सर्व वातावरण एकदम निराळं असल्यामुळं प्रथम प्रथम तो बावरला. परंतु प्रत्यक्षात स्वतःला धीट बनवून तो विद्यार्थ्यात मिसळला. मात्र गोरे-काळे यांच्यात केला जाणारा भेद त्याच्या हृदयाला काट्याप्रमाणे टोचू लागला. त्याच्यासमवेत शिकणाऱ्या एका आयरिश विद्यार्थ्यानं उत्सुकता प्रकट केली.

''हिंदुस्थानची लोकसंख्या किती?''

''तीस करोड.''

जर्मन विद्यार्थ्यानं गंभीर स्वरात प्रश्न केला,

''इंग्रज कितीसे आहेत?''

''सव्वा लाख.''

''कमाल आहे! तुम्ही माणसं की मेंढरं ?''

त्यात लपलेला अर्थ त्यानं जाणला. ते मिळालेलं आव्हानच होतं. परंतु पेलायचं कसं? ही समस्या त्याच्यासमोर उभी राहिली. रात्रंदिवस तो विचार करू लागला.

एका सकाळी तो लायब्ररीत काही पुस्तकं पाहात असताना, पुन्हा त्याच आयरिश विद्यार्थ्यानं त्याला आल्बम दाखवून प्रश्न केला.

''यात अनेक राष्ट्रपुरुष आणि झेंडे आहेत. तुझ्या देशाचा ध्वज कोणता?''

त्या प्रश्नांन त्याला अपमानित केलं तो एकदम स्तब्ध झाला. बावरलेल्या नजेरनं त्याच्याकडे पाहून, कर्तारने युनियन जॅकवर तर्जनी ठेवली. तो विद्यार्थी उपहासानं उत्तरला,

''माय फ्रेंड, हा इंग्रजांचा झेंडा तुमच्या देशावर स्वामित्वाच्या अहंकारानं फडकताना पाहून तुम्हाला काहीच कसं वाटत नाही? आम्ही आयरिश गुलामगिरीत राहण्यापेक्षा मृत्यूला जवळ घेणं पसंत करतो. दोस्ता, असं स्वस्थ बसण्यात तुम्हाला कसला आनंद?''

स्वतंत्र्य देशातल्या त्या तरुणाचे उद्‌गार ऐकून कर्तारच्या मनात देशप्रेमाच्या ठिणग्या पडल्या. हळूहळू त्या प्रज्वलित होऊ लागल्या इतर शीख विद्यार्थीही पेटून उभे राहिले. याचवेळी लाला हरदयाळ कॅनडात असणाऱ्या हिंदुस्थान्यांना जागृत करीत होते. ते सॅन फ्रान्सिस्कोमध्ये असल्याचं समजताच, तो जाऊन त्यांच्यासमोर उभा राहिला. त्यांची मूर्ती हृदयात कोरून शब्द कानात साठवू लागला. सभा संपल्यावर आसपास कोणीही नसल्याची खात्री करून कर्तार त्यांना भेटला. थोडंसं बोलणं झाल्यावर, तिथंच त्यानं प्रतिज्ञा केली. त्याच दिवसापासून त्याच्या क्रांतिकारी जीवनास प्रारंभ झाला.

तो 'गद्दार' या क्रांतिकारी पत्राच्या संपादकांना मदत करू लागला. ती

पत्रं खपविण्यासाठी तो फिरू लागला. अनेक हिंदुस्थान्यांना भेटून स्वातंत्र्याविषयी बोलू लागला. त्यांच्या मुलांना देशभक्तीची गाणी शिकवू लागला. या कार्याला वाहून घेण्यासाठी त्यानं कॉलेजही सोडलं. तो रायफल- पिस्तूल शिकण्यासाठी निर्मनुष्य स्थळी जाऊ लागला. थोड्याच दिवसात त्यानं त्यात प्रावीण्य प्राप्त केलं. तो आता संधीच्या प्रतिक्षेत उभ्या राहिला.

१९१४ मध्ये महायुद्ध सुरू झालं. इंग्रज सरकारनं निर्विकारतेनं रणभूमीवर मरण्यासाठी हिन्दुस्थानातले सैनिक आणले. हे पाहून अमेरिका आणि कॅनडात क्रांतिकारी योजना तयार होऊ लागल्या. कर्तार त्यात सामील झाला. त्याचं देशप्रेमानं ओथंबलेलं बोलणं, वागणं पाहून रासबिहारी बोसला त्याच्याबद्दल खात्री झाली. अतिशय आनंदानं त्याला मिठीत घेत त्यानं विचारलं,

''तू पंजाबात जाऊन लोकांची मनं तयार करशील का?''

''जरुरऽऽ देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राण द्यावा लागला तरी देईन.''

''शाब्बास तू आता इथं न थांबता पंजाबात जाऽ.''

''ठीक आहे.''

तो खरोखरच हिंदुस्थानाकडे निघाला. पंजाबातल्या गावागावात फिरून त्यानं लोकांच्या मनात क्रांतिकारी भावना निर्माण केली. साधारण याचवेळी 'कामा गाटामारु', 'तोशिमारु' इत्यादी जहाजातून अमेरिका, सिंगापूर, हाँगकाँगमधून हजारो शीख, मुसलमान, हिंदू पंजाबात उतरले. सचिंद्र संन्याल, विष्णू पिंगळेला रासबिहारीनं पूर्वीच पाठवलं होतं. ते अनुभवी असल्यामुळं कर्तारनं उत्सुकता प्रगट केली,

''पंजाबप्रमाणे बंगालमध्येही आंदोलन होणार का?''

त्याच्यावर नजर स्थिरावून, मनाचा अंदाज घेत विष्णू उत्तरला,

पंजाबमध्ये सैनिक निर्माण होतात, जणू काय तो त्यांचाच प्रदेश आहे. पंजाबात आग पेटल्यावर बंगाल स्वस्थ कसा बसेल?''



''अभी समझा. लेकिन एक सवाल है।''

''क्या? बोलो.''

''हे सर्व करण्यासाठी शस्त्रं, बाँब हवेत ना ? त्यासाठी पैसा कुठून आणायचा?''

''एवढंच? आसपास नजर फेक.इतकी घरं आहेत.''

त्याच्या शब्दातला गूढ अर्थ त्याच्य ध्यानात आला. त्यानं टाळी वाजवून आनंद व्यक्त केला. विष्णू चिंतायुक्त स्वरात म्हणाला,

''कर्तार, योजना तयार केल्याशिवाय काही करू नकोस. फुकट मरशील.''

''मतलब?''

''प्रथम टेहाळणी, सोयीची वेळ आणि मार्ग निश्चित केल्याशिवाय पाऊल टाकू नकोस.''

त्याला आणखी काही सूचना दिल्यानंतर विष्णू आणि सचिंद्र चालू लागले. कर्तारनं आपल्या सहकाऱ्यांना योग्य सूचना दिल्या. त्यानंतर कामाला सुरुवात झाली. श्रीमंत घरावर धाडी घालून त्यांनी पैसा जमा केला. कर्तार, विष्णू, सचिंद्र, राशू यांनी योजना तयार करून विद्रोहाचा दिवस निश्चित केला. मात्र त्याचवेळी कुणीतरी स्वार्थान्ध होऊन इंग्रज अधिकाऱ्याला खबर दिली. चहूकडून त्यांना पोलिसांनी घेरलं. गोळीबार सुरू झाला. त्यात बरेच जण मृत्यूमुखी पडले. कर्तार, विष्णू, राशू वगैरेंना पोलिसांनी पकडलं. कर्तार निराश झाला. त्याला वैफल्यानं ग्रासलं. त्याला देशाच्या स्वातंत्र्यासाठी खूप खूप करायचं होतं. परंतु गिरफ्तारीतून मुक्त होण्याचा मार्ग म्हणजे फाशीच! या परिस्थितीतून मार्ग काढण्याच्याच विचारात मग्न असता, त्याच्या मागच्या खिडकीतून चिमणी आली. तिच्या चोचीतली काडी खाली पडली. तीन-चारदा झेपावून ती

त्याग, प्रेम के पथपर चलकर, कभी न कोई हारा, हिम्मतसे पतवार सम्भालो, फिर क्या दूर किनारा।

काडी तिनं उचलली आणि वळचणीत ठेवली. ते दृश्य पाहून कर्तारला प्रेरणा मिळाली. दोन दिवसात त्यानं मार्ग शोधून काढला. एका पहाटे तो पळाला. वेष बदलून तो लाहोरला आला.

एका रात्री तो सर्व सहकाऱ्यांसमवेत एका पडक्या घरात आला. हनुवटीवरची दाढी कुरुवाळीत तो बोलला,

''प्रथम आपण दारुगोळ्याचा कारखाना उडवून देऊ.''

''योजना सांगा. आम्ही तयार आहोत.'' सर्वजण उत्साहाने म्हणाले.

सर्व समजावून सांगितल्यावर, त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला उत्साह पाहून तो आनंदानं म्हणाला,

''उद्या रात्री बारा वाजता स्टेशनपाशी या.''

सर्व मंडळी होकार देऊन चालू लागली. त्या रात्री कर्तारला झोपच आली नाही. रात्रभर त्याला दारूगोळ्याच्या कारखान्यातून होणारा भयंकर आवाज ऐकू येत होता आणि आकाशाला भिडलेल्या ज्वाला दिसत होत्या. दुसऱ्या दिवशीही रात्र होईपर्यंत तो बेचैन मनानं वावरत होता. अंधार पसरताच तो बाहेर पडला. आपल्याच नादात चाललेल्या कर्तारवर पोलिसांनी अचानक झडप घातली. तो गिरफ्तार झाला. पोलिसांनी त्याला एका कोठडीत बंद केलं. तिथं डास, ढेकूण, पिसवांचा बुजबुजाट होता. जमीन उखडलेली होती आणि सर्वत्र धुळीचं साम्राज्य होतं. दिवसाही काळोख जाणवत होता. सर्वत्र कडेकोट बंदोबस्त असल्यामुळं, बाहेर पडण्याचा मार्ग खुंटला होता. समोर 'मृत्यू' उभा होता. तो स्वतःशीच बोलला,


''अमेरिकेत असताना अपमानानं जळत होतो. त्यापेक्षा त्यापेक्षा क्रांतिकारी कीर्ती प्राप्त करून मरणं उत्तम! मी मेलो तरी, माझे असफल प्रयत्न निश्चितच लोकांच्या ध्यानात राहतील.''

काही दिवसांनंतर त्याच्यावर राजद्रहोचा आरोप ठेवून, त्याला पोलिसांच्या पहाऱ्यात कोर्टात उभं केलं. सरकारनं वकील नियुक्त न केल्यामुळं त्याला स्वतःची बाजू मांडता आली नाही. सरकारी वकिलानं केलेले आरोप त्यानं मान्य केले. त्या इंग्रज न्यायाधीशाला कर्तारची तेजस्वी निर्भयता पाहून फार कौतुक वाटलं. हा तरुण इंग्लंडमध्ये असता तर मी भरभरून शाबासकी दिली असती. परंतु हिंदुस्थानात आम्हास राज्य करायचंय; म्हणून इथं कठोर शासनच असणं जरुर आहे. असा विचार करून त्यानं कर्तारला विचारलं,

''परिणाम तुला माहीत आहे कां?''

कर्तारनं गालावरच्या दाढीवर तर्जनी फिरवली. न्यायाधीशांवर नेत्र रोखून उत्तर दिलं,

''महाशय, गुलामगिरीच्या शृंखलात जखडलेल्या मातृभूमीला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यासाठी केलेला प्रयत्न गुन्हा नसताना, तुम्ही मला गुन्हेगार ठरवून सजा देणार



आहात ना? ठीक आहे. परंतु माझी एक विनंती मान्य करावी.''

''कोणती ? बोलाऽऽ.''

''मला जन्मठेप न देता लवकरात लवकर फासावर चढवावं. त्यात मला मिळणारा आनंद हिरावून घेऊ नये.''

''महाशय, फाशी गेल्यावर याच भूमीत मी पुन्हा जन्म घेईन आणि माझ्या मातृभूमीला आजादी प्राप्त करून देईन.एक 'कर्तार' मरेल परंतु हिंदुस्थानातल्या घराघरातून असंख्य कर्तार जन्म घेतील. त्यांना फाशीवर चढवण्यासाठी दरिद्री इंग्रज सरकारकडे तेवढे फासही असणार नाहीत. म्हणून म्हणतो; मला फाशीचीच सजा द्यावी.''

क्षणभरानंतर त्याच्यावरील आरोपपत्र वाचून न्यायाधीशांनी त्याला फाशीची शिक्षा सुनावली. त्याचे शब्द ऐकताच आनंदानं टाळ्या वाजवण्यासाठी त्यानं हात उचलले, परंतु ते बंदिस्त होते. त्यानं न्यायाधीशांचे मनोमन आभार मानले, तेव्हा इंग्रज न्यायाधीश आश्चर्यानं पाहात राहिला. हे हिंदुस्थानी तरुण कशाचे बनले आहेत? हेच त्याला समजेना. फाशीची शिक्षा ऐकल्यानंतर दिवस निश्चित होईपर्यंत त्याला त्याच कोठडीत ठेवलं होतं, तरी त्याचं वजन वाढलं. तो उत्साहानं गाणी गाऊ लागला. मात्र त्याला भेटण्याची कोणालाच परवानगी मिळाली नाही. फाशी देण्याचा दिवस निश्चित होताच, त्याच्या घरी खबर पाठवली. कार्तिक-मार्गशीर्ष सुरू



असल्यामुळं खूप थंडी होती. सर्व व्यवहार थंडावले होते. तरीही त्याचे म्हातारे आजोबा काठी टेकीत शिपायाबरोबर त्याच्या कोठडीजवळ आले. फक्त एकोणीस-वीस वर्षाचा, अत्यंत बुद्धिमान, देखणा आणि घराच्या सर्व आशा केंद्रित झाल्या आहेत, असा लाडका नातू फासावर चढणार, याचं त्यांना फार फार दुःख झालं, म्हाताऱ्या नेत्रातून निथळणारे अश्रू पुसत त्यांनी आर्त स्वरात प्रश्न केला,

''पुत्तर, प्रत्येक माणसाला कॉलरा, प्लेग, देवी आणि म्हातारपण वगैरेमुळं मरण येतं. तू काहीही कारण नसताना कशासाठी मरण पत्करतोस?''

त्यांच्याकडं पाहून तो गमतीनं खळळून हसला. त्यांच्यावर नेत्र स्थिरावत तो उत्तरला,

''दादाजी, त्यांच्या मरणापेक्षा माझा मृत्यू दसपट श्रेष्ठ आहे. तुम्ही उगीचच अश्रू गाळता आहात. दादाजी माझ्या भावडांवर खूप प्रेम करा. म्हणजे तुम्हाला माझा विसर पडेल. आता मला आनंदानं निरोप द्या.''

यावर ते काय बोलणार ? अश्रूपूर्ण नेत्रांत त्याचं रूप साठवून ते चालू लागले.

त्यानंतर बरोबर पाचव्या दिवशी संध्याकाळी त्याला स्नानासाठी बाहेर आणलं. गार पाण्यानं स्नान केल्यावर, त्यानं स्वतःचे कपडे चढवले. 'वंदेमातरम्', 'इंग्रज सरकार मुर्दाबाद' अशा बुलन्द घोषणा देत तो कोठडीपाशी आला. त्यानं गुरुनानक, गुरु गोविंदसिंगाचं स्मरण केलं. त्याला नेण्यास आलेल्या अधिकाऱ्यांसमवेत तो 'वंदेमातरम्ऽ' अशा बुलन्द घोषणा देत चालू लागला. मुख्य दरवाजापाशी येताच, त्याला जेलच्या इंग्रज अधिकाऱ्यानं सहज प्रश्न केला,

''तुझी अंतिम इच्छा काय आहे?''

इंग्रजांनी तुरन्त हिंदुस्थानातून निघून जावं.''

जीवनाच्या अंतिम क्षणी त्याची एवढीच इच्छा राहिली होती. तो तसाच ताठ मानेनं निघाला. निःस्तब्ध शांतता पसरली. तो तसाच वधस्तंभापाशी आला. मातृभूमीचं स्मरण करीत उभा राहिला. त्याच्या मुखावर काळा बुरखा ओढून, त्याची मान फासात अडकवली गेली. खट् आवाज होऊन त्याचा सचेतन देह अचेतन होऊन लोंबकळू लागला.

●●●

**श्रीमती नयनतारा देसाई**
आनंदनगर, सिंहगड रस्ता पुणे ५१


स्वप्न जो छोडा अधूरा, पूर्ण निश्चय हम करेंगे। राष्ट्रभक्ती को जगाने, हम बढे गिरिग्राम बनेंगे।

# कवक प्रसृष्टी

**डॉ. पुरुषोत्तम जोशी**

मी? आहे अशीच एक प्रसृष्टी। ज्या असंख्य मित्रांच्या सहभागामुळे मी निर्माण झाले त्या माझ्या सर्व मित्रांना पूर्वीचे अभ्यासक वनस्पतीचा वर्ग मानीत असत. त्या मानण्याला दोन प्रमुख कारणे होती; त्यातील एक म्हणजे त्यांच्या शरीराच्या पेशींना भित्तिकेचे आवरण होते. हे आवरण कठीन (Chitin) नावाच्या कर्बोदकाचे बनलेले होते. खरंतर आजही त्या भित्तीकांचे आवरण याच रसायनाचे बनलेले आहे. त्यातील दुसरे कारण म्हणजे, हे मित्र आपले सारे आयुष्य वनस्पतींसारखे एकाच जागी, स्थिर राहून व्यतीत करीत. त्यांची आजही हीच स्थिती असली तरी वनस्पतींमध्ये आढळणारी काही वैशिष्ट्ये माझ्या या मित्रामध्ये मुळीच आढळून येत नाहीत. ही वैशिष्ट्ये म्हणजे त्यांच्या पेशींमध्ये हरितद्रव्य (chlorophyll) आजिबात नसते आणि ते स्वतःला लागणारे अन्न स्वतः तयार करू शकत नाहीत. त्यांना अन्नासाठी दुसऱ्या कोणावर तरी अवलंबून राहावे लागते. या भिन्न वैशिष्ट्यांमुळे की काय, आजचे अभ्यासक मला वनस्पतींचा एक वर्ग असे न मानता एक स्वतंत्र प्रसृष्टी मानतात. त्यांनी या प्रसृष्टीला ''कवक'' नाव दिले आहे!

माझ्या या मित्रांची ते कवक प्रसृष्टीतील म्हणून आणखी काही वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या शरीराच्या सर्व पेशींमध्ये पेशी केन्द्र असते आणि त्या पेशी केन्द्राला निश्चित असे आवरण असते. या पेशींची जेव्हा वाढ होते तेव्हा, त्या गोलाकृती वा लंब गोलाकृती किंवा काटकोनी आकार धारण करीत नाहीत. त्या एखाद्या नळीसारख्या लांबच लांब वाढत जातात. पेशी केन्द्राचे विभाजना होऊन दोन वेगवेगळी पेशीकेन्द्रे तयार होतात. परंतु त्या दोघांमध्ये विभाजनदर्शक भित्तिका नसते. पेशी बहु पेशीकेन्द्र युक्त असतात. या पेशींना कवक-धागा (hyphae) (आकृती -१,ध) म्हणतात. पुढे या धाग्याची जसजशी वाढ होत जाते तेव्हा त्यांच्या जमिनीकडील टोकाला अनेक फाटे फुटतात आणि त्यांचे जाळे बनते. या फाट्यांना कवक-जाळे (mycelium) म्हणतात. (आकृती १- ज) कवक धाग्यांच्या आकाशाच्या बाजूच्या टोकाला




आकृती - १


बहुतेक करून बीजाणूधानी (आकृती १-ब) असते. या बीजाणूधानीमध्ये असंख्य बीज कण (spores) असतात. त्यापासून नव्या बुरशीची निर्मिती होते.

माझ्या या मित्राना अन्न स्वतः तयार करता येत नाही; हे मी पूर्वी सांगितले आहेच. परंतु पोटपूजा त्यांना करावी लागतेच. त्यासाठी या मित्रांपैकी काहीजण आपल्या अवतीभवतीच्या जागेवर आपल्या शरीरातील पाचक स्राव सोडतात. हे पाचक स्राव तेथील सेंद्रिय पदार्थांचे पाचन करतात. मग पाचन झालेले पदार्थ हे मित्र भित्तिकांद्वारे शोषून घेतात. काही मित्र वनस्पतींवर किंवा प्राण्यांवर राहतात. आपल्या कवक जाळ्यातील फाटे प्राण्यांच्या अथवा वनस्पतींच्या पेशींमध्ये किंवा पेशीभित्तीकांधल्या फटींमध्ये किंवा पेशीभित्तीकांमधल्या फटींमध्ये घुसवून त्यांच्या साह्याने पेशीरस शोषून घेतात. काहीजण अल्प सहजीवी जीवन जगतात.

माझे बहुतेक कवक-मित्र अमैथुनिक पद्धतीने प्रजनन करतात. या पद्धतीत कवक जाळ्याचे तुकडे पडतात आणि त्या तुकड्यांपासून नवीन पूर्ण विकसित कवक निर्माण होते. काहीजण अमैथुनिक पद्धतीने बीजाणूंची निर्मिती करतात, हे जीवाणू -धानीमध्ये तयार होतात. त्यांची पूर्ण वाढ झाली की धानी तडकते, बीजा बाहेर फेकले जातात आणि वाऱ्याबरोबर किंवा पाण्याबरोबर वाहत जातात. काही मित्र प्रजननासाठी मैथुनिक पद्धतीचा उपयोग करतात. हे मित्र बहुधा छत्रधारी (आकृती-२, क) असतात. छत्राच्या अरीसारख्या भागामध्ये, स्त्री व पुरुष बीजे निर्माण करणारे बाजकोश (Basidia) असतात. ते वाळून तडकल्यावर स्त्री-पुरुष बीजे बाहेर पडतात. त्यांचे मीलन झाल्यावर बीजाणू तयार होतात. हे बाजीणूही वाऱ्यबरोबर किंवा पाण्याबरोबर दूरवर जातात.

*होणार नाही कुणी दिवा, मिळणार नाही उबदार हात, तुझी तुलाच चालीवी लागेल, पायाखालची एकाकी वाट.*

**छात्र प्रबोधनला हार्दिक शुभेच्छा! प्रायोजक - विश्वकुमार विश्वनाथ आर्किटेक्टस्, प्रा. लि. पुणे.**




आकृती –२

या माझ्या मित्रांच्या रंगरूपात, राहणीत, अन्न ग्रहणाच्या आणि प्रजननाच्या सवयींमध्ये विविधता आहे. त्यामुळे त्यांच्या त्यांच्या वैशिष्ट्यांनुसार त्यांचा वेगवेगळ्या वर्गांमध्ये समावेश करण्यात आला आहे– १) ज्यांच्या पेशीतील दोन पेशी केन्द्रांमध्ये विभाजन दर्शक भित्तीका नसते; तो एक वर्ग. त्याला इंग्रजीमध्ये फायकोमायसीटस् (phycomycetes) (म्हणतात) तुम्हाला माहिती असलेली बुरशी हे त्या वर्गाचे एक उदाहरण आहे. २) ज्या कवकांच्या पेशींचा आकार थैलीसारखा असतो; तो वर्ग दुसरा. त्याला इंग्रजीत ॲस्कोमायसीटस (Ascomycetes) म्हणतात. तुम्हाला माहिती असलेले ''यीस्ट'' हे त्या वर्गाचे एक उदाहण होय. ३) ज्या कवकांचे बीजकोश छत्रासारख्या अवयवात असते; तो माझा तिसरा वर्ग. त्याला इंग्रजीध्ये बेसिडोमायसीटस(Besidomycetes) म्हणतात. तुम्हाला ठाऊक असलेली अळंबी हे या वर्गाचे एक उदाहरण आहे. ४) वर उल्लेख केलेल्या वैशिष्ट्यांपेक्षा वेगळीच वैशिष्ट्य असणाऱ्या कवकांचा चवथा वर्ग. त्याला इंग्रजीमध्ये इम्परफेक्टाय् (Imperfecti) म्हणतात. तुमच्या घरी, मसाल्यामध्ये वापरण्यात येणारे ''दगड फूल'' हे या वर्गाचे एक उदाहरण होय!

अशी आहे माझी कवक–प्रसृष्टीची ओळख. ही ओळख तुम्ही अजिबात विसरणार नाही याची मला खात्री आहे !

●●●

**डॉ. पुरुषोत्तम जोशी**
गृहप्रकल्प ११, लोकमान्य हॉस्पिटलसमोर, एरंडवन, पुणे ४

## अभंगातील विहंग

एकविसाव्या शतकाचे स्वागत करण्यासाठी आपण कॉम्पुटर घेऊन सज्ज आहोत. अद्ययावत तंत्रज्ञान शिकण्यासाठी आपण वेगवेगळ्या क्लिष्ट शास्त्रीय भाषा आत्मसात करत आहोत.

तंत्रयुगाच्या धूसर सामीरेषेवरून कसरत करत चालताना, मनाचा तोल ढासळू नये याकरता, भारतीय संस्कृतीने सुबोध, प्रकाशमय संत वाङ्मयाचा ठेवा आपल्याला दिला आहे. पण आज नकळत आपण आपल्या पुरातन ग्रंथांपासून दूर जात आहोत.

उत्तुंग आकाशात भरारी घेऊ पाहाणाऱ्या तुमच्या मनासमोर आभाळ जिंकणाऱ्या पक्ष्यांचा आदर्श असतो. या लेखांमधून, एका अभिनवरितीने,, संत वाडम्यातील पक्ष्यांचा उल्लेख असणारे काही निवडक अभंग तुमच्या समोर सादर करण्याचा मानस आहे. पक्ष्यांचा रूपकात्मक उपयोग करून संतांनी आयुष्य जगण्याचे तत्त्वज्ञान रसाळपणे सांगितले आहे. हे पाहताना संतवचनांत दडलेली पक्ष्यांची अचूक निरीक्षणेही आपण बघू.

हे वाचताना तुम्हाला वाङ्मयाचे वाचन करावेसे वाटले तर, आमचा उद्देश फळास जाईल. जो आपल्या इतिहासाचा आदर करतो, त्यालाच वर्तमान आणि भविष्य विजयमाला घालतात. तुमच्या यशवंत वाटचालीतून तंत्रयुगातील रुक्ष वातापणात प्रवेश करताना, सु–स्वर गाणारे पक्षी, हिरवीगार तरूवरे आणि सोयरीक साधणाऱ्या वनचरांचा विसर पडू देऊ नका...

वृक्षवल्ली आम्हा सोयरीं वनचरें।
पक्षीही सुस्वरें आळविती।।

(तुकाराम गाथा – अ. १७२०)

**तुम्ही असाच एखादा पक्षीवर्णन असणारा अभंग शोधून, अर्थासहित आमच्याकडे पाठवा.**

**डॉ. सतीश पांडे**, सी/९, भोसले पार्क, सहकार नगर २, पुणे ९

*जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत, सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत.*

**श्री. शिरीष पोंक्षे व श्री. प्रसाद पुरंदरे यांच्याकडून प्रबोधकांना हार्दिक शुभेच्छा !**

# मधुबोल

संजीवनी बोकील

*मुलांनो, पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेल्या ज्ञानेश्वरीतील ओव्या, अभ्यासताना तुम्हाला अवघड वाटल्या असतील; परंतु आपल्या विद्यार्थ्यांना त्या शिकवत असताना संजीवनी बोकील यांना आपल्या, रोजच्या जीवनाशी निगडित धागेदोरे प्रकाशकिरणांसारखे लख्ख सापडले. तो खजिना विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील उदाहरणे देऊन त्यांनी तुमच्यासाठी खुला केला आहे.*

*ज्ञानेश्वरीतील एका अर्थपूर्ण ओवीच्या माध्यमातून त्यांनी मधुबोलाचे म्हणजेच गोड बोलण्याचे महत्त्व तुमच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, ''हा फक्त ओवीचा अर्थ नाही, दृष्टांताचे स्पष्टीकरण नाही, तर त्यानिमित्ताने मनात आलेले विचार एकत्र करून गुंफलेला गोफ आहे.''*

*ह्या लेखातील 'हर्षल' आणि 'सुवर्णा' नक्कीच तुमच्याही वर्गात असतीलच, तुमच्या स्वतःमध्येही दडलेले असतील. आत्मनिरीक्षण करून मकर संक्रांतीनिमित्ताने मधुबोलाचे महत्त्व जाणून, गोड बोलयला शिकणार या !*

मुलांनो शाळेत, घरात वावरत असताना नेहमीच आपल्या मनासारखं घडत असं नाही. सगळीच माणसं आपल्या इच्छेप्रमाणेच वागतात असंही नाही. अशावेळी आपण खूपदा रागावतो, चिडतो आणि एकदा हे रागाचं भूत आपल्यावर स्वार झालं ना, की मग आपण कसं वागायचं? हे आपल्या हातात राहात नाही घोड्याने कसं धावायचं, कुठे वळायचं, कुठे थांबायचं हे जसं त्याच्यावर स्वार झालेल्या, लगाम हाती धरलेल्या माणसाच्या हाती असतं, तसे मग आपले सारे लगाम या रागाच्या हातात जातात आणि शब्द म्हणजे भावना व्यक्त करायची साधनंच! मनात राग असला की आपण दुसऱ्याला नको तसे बोलतो, टाकून बोलतो, तोडून बोलतो. समोरच्याचा त्यामुळे अपमान होतो. खूपदा असं होतं की, आपला राग निघून गेला की मग आपली चूक आपल्या लक्षात येते. पण तोवर वेळ निघून गेलेली असते. समोरच्या माणसाच्या मनात आपण अप्रितीचे बी पेरून ठेवलेले असते. मग त्याला प्रेमाची, स्नेहाची फुलं कुठून येणार?

आणि एकदा धनुष्यातून सुटलेला तीर जसा परत येऊ शकत नाही. तसेच दुसऱ्याला दुःखी करणारे शब्द आपण परत घेऊ शकत नाही. मग ते आपल्याला जपूनच वापरायला हवेत. होय की नाही? म्हणूनच म्हणतात ना –की शब्द हे शस्त्र आहे. ते जपून वापरा.

जगात जगताना, लहानाचे मोठे होत असताना, आपल्याला अनेक बाबतीत अनेक लोकांची गरज लागते. मदत उपयोगी पडते. आपण जर सर्वांशी गोड बोललो, मिळून-मिसळून राहिलो तर आपल्यालाही तशीच वागणूक मिळते. उदाहरणच द्यायचं तर, आपण डोंगरातल्या गुहेत प्रतिध्वनीची गंमत बघताना जे शब्द उच्चारतो तेच आपल्याला परत मिळतात. गोड हाक मारलीत तर तसंच गोड उत्तर मिळेल. खेकसून हाक मारलीत तर तशीच हाक तुमच्याकडे परत येईल.

आमच्या शाळेत हर्षल नावाचा एक उत्तम पोहणारा मुलगा होता. तसा साधासुधाच पण मनाने अगदी मोकळा. सगळ्यांशी गोड बोलायचा. कुणालाही कसलीही मदत करायला नेहमी तयार ! वर्गातल्या एका अपंग मुलाला तर तीन जिने उतरताना पाठुंगळीला घेऊन उतरायचा. सहलीला जा, सतरंज्या पसरण्यापासून ते क्रिकेट खेळण्यापर्यंत सगळ्यांनाच हर्षल हवा.

हर्षल फार लहानपणापासून चांगला पोहायचा. पोहोण्याची अनेक बक्षिसे, अनेक ढाली पटकावल्या होत्या त्याने! आपण इंग्लिश खाडी पोहून दाखवावी, अशी त्याची फार मनापासूनची इच्छा होती. पण इंग्लंडला जायचं, तेसुद्धा एकट्याने नव्हे, बरोबर २/३ तरी माणसे हवीत. मग कसे जमणार? त्याने आपली अडचण शाळेचे मुख्याध्यापक, वैद्य सरांना सांगितली. सर म्हणाले,



''हात्तेच्या, एवढंच ना ! अरे तू काही एकटा नाहीस, सगळी शाळा आहे तुझ्या मागे !''

सरांनी गसळ्या शाळेला एकत्र बोलावलं. हर्षलची अडचण सांगितली, ''आपल्या या मित्राला चांगल्या कामात हातभार लावायचा की नाही ?''

सगळ्यांनी भराभरा आपापल्या परीने वाटा उचलला. शिक्षकांनी एक दिवसाचा पगार दिला. झालंऽ आमचा हर्षल इंग्लिश खाडी पोहूनसुद्धा आला.

याउलट नववीतील सुवर्णा! सुवर्णाला सगळं तिच्या मनासारखं व्हायवा हवं, नाचात पुढच्या रांगेत उभं करायला हवं, वर्गातसुद्धा तिचंच म्हणणं सगळ्यांनी ऐकायचं. नाही तर चढला पारा...

एकदा पावसाळ्यात सुवर्णा घसरून पडली. पाय मोडला. प्लॅस्टर घालावं लागलं आणि एक महिनाभर बिछान्यावर पडून राहांव लागलं. पडून पडून सुवर्णा कंटाळली. तिला वाटे, मैत्रिणींनी घरी यावं, गप्पा माराव्यात, बुडलेला अभ्यास भरून काढायला मदत करावी. पण कसलं काय नि कसलं काय – ज्या मैत्रिणींची मनं तिनं दुखवली होती, त्या तिच्याकडे कशा जातील ? सुवर्णा रडरड रडली. तिने खूप निरोप पाठवले, गोड शब्दात चिठ्ठ्या पाठवल्या. पण उपयोग काय? ज्ञानेश्वरांनी या अनुभवाचे जणू काही सारच दुसऱ्या अध्यायातल्या दृष्टांतात सांगितले आहे. शब्दाला बीजाची उपमा देऊन ते काय म्हणतात पाहा –

**जैसी सर्वथा बीजें आहलली ।**
**सुक्षेत्रिं जऱ्ही पेरिली ।**
**तऱ्ही न विरूढती चि**
**सिंचिलिंव । भले तैसी ।।**

''उत्तम मशागत केलेल्या शेतात भाजलेले बी पेरिले व नंतर कितीही पाण्याने ते शेत शिंपले तरी त्याची (उगवून) रोपे होऊ शकत नाहीत.''

तेव्हा मुलांनो, गोड वचनांचं महत्त्व आणि कडू शब्दांमुळे होणारं नुकसान लक्षात ठेवून जर आयुष्यात वागाल तर खूप मित्र-मंडळी मिळवाल आणि मित्र-मंडळी हेच आपले खरे दागिने, आपली खरी श्रीमंती, आपली खरी कवचकुंडले, होय ना ? ●●

**प्रा. संजीवनी बोकील**
विजयालक्ष्मी अपार्टमेंन्ट, रामबाग कॉलनी, पौड रोड, पुणे ३८

## ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

(दिल्लीच्या केंद्रीय शिक्षण मंडळाशी संलग्न इ. ५ वी ते १० वी मित्र माध्यमाची शाळा)

**इयत्ता पाचवी प्रवेश चाचणी (१९९९-२०००)**

(इ. ४ थी पर्यंत मराठी/ इंग्रजी माध्यमात शिक्षण घेत असलेले विद्यार्थी अर्ज करु शकतात.)

**प्रवेश चाचणी**

दि. ७ मार्च १९९९. दु. ११ ते ३

**प्रेवश अर्ज**

दि. १ फेब्रुवारी पासून २० फेब्रुवारीपर्यंत प्रवेशद्वाराजवळ
स्वागत कक्षा दु. ११ ते सायं. ७ पर्यंत उपलब्ध

**प्रवेश अर्जाची किंमत**

प्रत्यक्ष रु ७०/- (पोस्टाने रु. ८०/-)
(वसतिगृहाची मर्यादित सोय फक्त मुलांसाठी)

**संपर्क : ज्ञान प्रबोधिनी**

५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०. दूरभाष - ४७८०९५.

समाजभक्ती हीच प्रेरणा, राष्ट्रभक्ती हे रूप तिचं, देशद्रोही निष्प्रभ होतील, दर्शन घडता शक्तीचे.

# सानेगुरूजी : एक आगळे वेगळे शिक्षक



छात्र विद्यार्थ्यांनो २४ डिसेंबर १९९८ पासून महाराष्ट्रातील एका थोर शिक्षकाची जन्मशताब्दी सुरू झाली आहे. या थोर शिक्षकांची ओळख तुम्हाला ह्यापूर्वीच पाठ्यपुस्तकातून झालेली आहे. श्री. पांडुरंग सदाशिव साने म्हणजेच 'साने गुरुजी' यांचीच जन्मशताब्दी विविध संस्थांमार्फत कार्यक्रमातून साजरी केली जाणार आहे.

'श्यामची आई' ह्या पुस्तकाद्वारे साने गुरुजी आजही सर्वांना ज्ञात आहेत. मुलांना संस्कारीत करणारे हे पुस्तक फक्त मुलांसाठीच नव्हे तर पालकांनाही मुलांच्या विकासात मार्गदर्शन करणारे व खऱ्या अर्थाने संस्कारग्रंथ असेच आहे.

साने गुरुजी हे एक पवित्र-मंगल नाव आहे. गुरुजी म्हणजे प्रेरणा देणारे, चैतन्य जागविणारे व्यक्तिभाव. गुरुजींनी सदैव मानवता धर्माची पूजा बांधलेली दिसते आणि म्हणूनच त्यांनी लिहिलेली **'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे.'** ही प्रार्थना आजच्या परिस्थितीत तर नंदादीपाप्रमाणे दिलासा देत राहते.

गुरुजींनी त्यांच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाला जीवनाची भरभरून शिदोरी दिली. आजही अनेक क्षेत्रांत ही धडपडणारी मुले कार्य करताना आढळतात.गुरुजी म्हणजे बालक-युवक आणि प्रौढांसाठीही एक चालते, बोलते विद्यापीठ होते. जेथे ते जात, तेथे चैतन्याचा झरा वाहत असे. आनंद ओसंडून वाहत असे. गुरुजी एक सद्भावनांचा झरा होते.

आजच्या शिक्षणात भावनेच्या बुध्यांकाचा विचार प्रामुख्याने पुढे येत आहे. तो विचार गुरुजींनी १९३० च्या काळातच शिक्षक म्हणून काम करताना केलेला होता. हे त्यांच्या त्यावेळच्या विद्यार्थ्यांनी सांगितलेल्या आठवणीतून आपणास प्रतीत होते. अमळनेरच्या प्रताप विद्यालयात १९२४ ते १९३० या काळात शिक्षक म्हणून काम करताना गुरुजींनी मुलांवर मूलगामी संस्कार घडविले.

साने गुरुजी शिकवीत तो काळ राष्ट्रीय चळवळीचा होता. शिक्षकांनी फक्त पाठ्यपुस्तकेच शिकवू नयेत तर जीवनाची संपूर्ण दृष्टी देणारे कामही द्यावे, असा त्यांचा दृष्टीक्षेप होता. साने गुरुजी राष्ट्रीय चळवळीचीही माहिती आपल्या विद्यार्थ्यांना देऊन त्यांच्यात राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती स्वातंत्र्यासाठी लढण्याची उर्मी जागृत करीत. त्याकाळात त्यांनी चालविलेले अभिनव उपक्रम म्हणजे हस्तलिखित 'छात्रालय' दैनिक. पहाटे चार वाजता उठून गुरुजी आपल्या वळणदार अक्षरात दैनिक लिहून काढत. वहीच्या आकाराची पाच पाने ते लिहीत. इतिहास आणि मराठी हे त्यांचे आवडते विषय.

साने गुरुजी अडल्यानडल्या गरीब मुलांना गुपचूप पैशाची मदत करत, पण त्याच बरोबर स्वावलंबी व्हावे, हेही मनावर बिंबवीत असत. कोणी मदत केली तर त्यांच्या ऋणातून मुक्त होण्याचा आनंद घेणारे गुरुजी होते. श्री. र.बा. केळकर यांच्या त्याकाळच्या विद्यार्थ्याने (ज्यांचे आजचे वय ९० वर्षे असेल) गुरुजींची आठवण सांगताना लिहिले आहे. ''मी एकदा गुरुजींचे काही सामान वाहून नेले. त्यानंतर एकदा गुरुजींकडे गेलो तर गुरुजींनी अरे, तुझी त्याला हमाली द्यायला नको को ? म्हणून भाजणीचे थालपीठ स्वतःच्या हाताने तयार करुन खाऊ घातले.'' गुरुजींच्या हातचा स्वयंपाक फार चविष्ट असे. विद्यार्थ्यांइतकेच गुरुजी इतरांवरही प्रेम करीत. छात्रालयातील गोपाळ ह्या गड्याच्या गंभीर आजारात गुरुजींनी त्याला स्वतःच्या खोलीत आणून त्याची शुश्रूषा केली. पाय चेपले. रात्र रात्र जागरण केले. पण गोपाळ जगला नाही. गुरुजी म्हणाले, ''गोपाळ म्हणजे माझा धाकटा भाऊच गेला.'' रुग्णसेवा म्हणजेच देवपूजा' असे गुरुजी सांगत. मानवाप्रमाणे निसर्गावरही त्यांचे तेवढेच प्रेम होते. छात्रालयात त्यांनी बाग लावली होती. बागेतल्या फुलांबरोबर त्यांचे मन फुलत असे आणि ते मुलांची मने फुलवित. एका आठवणीत असा उल्लेख आहे, गुलाबाच्या रोपट्याला जेव्हा पहिली कळी आली तेव्हा घरात एखादे तान्हे जन्माला यावे, असा जन्मोत्सव त्यांनी केला. वर्गात तास घेताना पाऊस पडत असेल तर शिकविणे थांबवून ते वर्ग सोडून देत असत.

गुरुजींना आपले विद्यार्थी शक्तिमान असावेत असे नेहमी वाटे, म्हणून विद्यार्थ्यांच्या व्यायाम करण्यावर ते भर देत असत. साने गुरुजी विद्यार्थ्यांसमवेत जोर-बैठकांचा व्यायाम करीत. गुरुजी चांगले मल्लखांबपटू होते, ही गोष्ट आजही अनेकांना नवीनच वाटेल.

आज आम्ही शिक्षणातून सर्वांगीण विकासाची अपेक्षा करतो. आपल्या विद्यार्थ्यांमधील गुण ओळखून त्याची प्रवृत्ती काय आहे, याची तात्काळ परीक्षा करून त्याप्रमाणे गुरुजी त्यांनी प्रोत्साहान देत. तू कविता न करता चित्रकलेकडेच लक्ष दे असं त्यांनी केळकरांना सांगितले. (पूर्वी या केळकरांचा उल्लेख केला आहे. ते नामांकित चित्रकारही आहेत) मल्हार चिकटे हा व्यायाम शौकीन विद्यार्थी, त्याला गुरुजींनी कुस्तीच्या प्रशिक्षणासाठी प्रोत्साहित केले तर प्रसिद्ध लेखक उमाकांत ठोंबरे यांना त्यांनी केलेल्या कविता वाचून सांगितले की ''चांगला गद्यलेखक हो.''

मित्रांनो, या गोष्टींचा उल्लेख यासाठी केला की, शिक्षणासाठी आवश्यक प्रशिक्षण वा अध्यापन पदवी नसलेली ही थोर व्यक्ती खऱ्या अर्थाने गुणग्राहक शिक्षक होती. आजच्या विद्यार्थ्यांभोवतालचे संपूर्ण जगच गतिमान झाले आहे. त्याचबरोबर आपापसातील संबंध, नाती मोडकळीस आली आहेत. अशा काळात, 'अंधार फार झाला, पणती जपून ठेवा' हे आपल्या आचरणात आणणारे साने गुरुजीसारखे शिक्षक आज आम्हाला हवे आहेत.

१९४६ च्या कुमार साहित्य मंडळाच्या अध्यक्षीय भाषणात गुरुजी म्हणाले होते, ''तरुणांवर, विद्यार्थ्यांवर माझा जीव आहे. त्यांच्यात राहून मीच नेहमी नवतरुण राहत असतो. माझ्या वाङ्मयाला हात लावला तर, माझ्या हृदयाला हात घालाल. मनुष्याचे भाग्य आहे की हातांनी तो जे करतो ते आधी त्याच्या हृदयात असते. जिज्ञासा हा आत्मा आहे. प्रत्येक वस्तूजवळ जाणे; तिला बघणे, तिच्याजवळ बोलणे यातील गंमत तर पाहा. तुम्ही झपाट्याने वाढाल.

मित्रहो, हा वाढण्याचा मंत्र जपू या. साने गुरुजींची खरी ओळख त्यांच्या साहित्यातून करून घेण्याचा संकल्प ह्या जन्मशताब्दिनिमित्त करुया आणि रोज 'श्यामची आई'चे एक प्रकरण वाचण्याचा निश्चय करूया.

●●

**डॉ. अरविंद कपोले, धुळे**

स्वदेशी सेवेवाचूनी दुसरा हृदयी भाव नसावा, मनामनांमधुनी असला नित् संस्कार घडावा

**'कल्पक बनू या' (कल्पनाशक्ती वाढविण्याची गुरुकिल्ली सांगणारे पुस्तक) ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन, किं. रु. ५०/-**

# कविता पानोपानी

## मुशाफिराचे गाणे

आभाळ झुलते वरी बिलगते ते क्षितिजाच्या काठा
पाउल माझे ओढुन नेती दूरदूरच्या वाटा !

दहा दिशा या खुल्या भोवती, फिरे मोकळे वारे
सांगा मजला कशा अडवतिल भिंती, खिडक्या, दारे?
अशा घडीला बसून राहिल घरात तोच करंटा!

स्वारीसाठी मला मिळावा उमदा अबलख घोडा
मधुनी मधुनी सावलीत अन् हवा विसावा थोडा
खाइन भाकर, लाविन पाणी ओंजळ भरूनी ओठा !

घोडा माझा चपळ धावता भरेल अंगी वीज
नवनवलाई बघता कुठला कंटाळा वा नीज ?
वाऱ्यालाही टाकिन मागे दौडत जाता जाता !

डोंगररानें पाहिन, पाहिन दूरदूरचे देश
कशी माणसे? कुठल्या भाषा ? कसे तयांचे वेष?
कुणिही देइल मुक्कामाला जागा - पडवी ओटा.

विशाल गवती कुरणे कोठे, रणरण कोठे वाळू
कुठे चांदणे निथळे, कोठे सूर्य पाहतो जाळू
फिरस्त्यास पण मुशाफरीचा काय फायदा तोटा ?

जग अवघे मी हिंडुन येइन पुन्हा अचानक दारी
कुतूहलाने माझ्याभवती गोळा होतिल सारी
म्हणतिल आणिक, 'अरे! तोच हा! किती जाहला मोठा!'

साडी नेसुन लाजत मुरकत येइल पुढती ताई
असतिल बाबा जरा वाकले, थोडी कसली आई
भरविल मजला ती बाळाच्या घासामधला वाटा !

**शान्ता ज. शेळके**
फ्लॅट नं १९ आदर्शनगर, पुणे-सातारा रस्ता, पुणे ३७

## भ्रष्टाचार निंदा स्तोत्रम्



भीमरुपी भ्रष्टाचारा, मृत्यू नसे तुला कधी
राजकारण्यांच्या सूता, बंडखोरांच्या नाथा ।।१।।

सृष्टे उचलता काठी, आवेशे लोटला पुढे,
काळाग्नि कलरुद्राग्नि, देखता मोदती मने ।।२।।

नाका ते मुरडिले क्रोधे, बंधने घातली बरी
सुवर्णचांदीपोटी, पैसे ही किंकिणती।।३।।

पापघडा पर्वताऐसा, पुण्य ते सडपातळु
सुवर्ण पाहता मोठे, महा त्या गगनापरी ।।४।।

कोटिच्या कोटी रुपये, झेपावे असंख्याकडे
पर्वताएवढी लाच, खाताचि सगळे भिडू ।।५।।

आणिला मागुती नेला, आला गेला तसाचि तो
रुपयासी टाकिले मागे, डॉलरशी तुळणा नसे ।।६।।

अणुपासोनि ब्रम्हांडा, एवढा होत जातसे
तयासि तुळणी कोठे, कोटिभांडार धाकुटे ।।७।।

गुणपुण्यसमंधादि, गोरगरिबी समस्तही
नासती तुटती चिंता, आनंदे धनदर्शने ।।८।।

भ्रष्टाचारी अग्रगण्यू, नाशकुलास मंडणू
धनरुपी अंतरात्मा, दर्शने दीन हासती ।।९।।

।।इति श्री धनदासकृतं, गरिबीनिरसनं,
भ्रष्टाचार स्तोत्रं संपूर्णम्।।

**कु. नेहा अजित धर्माधिकारी, इ. ९ वी,**
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे.

समता, ममता, न्याय, श्रमांचे गाणे अधरावरती असावे, कर्तव्याचे समरसतेचे मंगलगीत गगनात घुमावे.

'प्रज्ञाबोध मालिका' NTS परीक्षेसाठी उपयुक्त प्रश्नसंच, किं. रु. २००/- ५ पुस्तकांचा संच, (इंग्रजी, मराठी दोन्हीमध्ये उपलब्ध ) छात्र प्रबोधन प्रकाशन.

# १९९८ बिंब प्रतिबिंब

राहुल नांगरे

**१९९८ हे वर्ष स्वतंत्र भारताच्या इतिहासात लक्षात ठेवले जाईल ते ११ व १३ मे रोजी घेण्यात आलेल्याअणु चाचण्यांमुळे. या चाचण्या म्हणजे भारताचे एकविसाव्या शतकात महासत्ता बनण्याच्या दृष्टीने उचललेले पाऊल होय. पण महासत्ता बनण्यासाठी राजकीय स्थैर्य आणि आर्थिक प्रगाती या दोन महत्त्वाच्या बाबी आहेत, हे दुर्लक्षून चालणार नाही. या दोन्ही आघाड्यांवर भारताला यावर्षी पीछेहाट सहन करावी लागली. मध्यावधी निवडणुकांनंतरही राजकीय अस्थैर्य कायम आहे. एका बाजूला भाववाढीचा आलेख सतत वाढतो आहे. त्याचबरोबर दुसरीकडे रुपयाचे अवमूल्यनही होत आहे. शेअर बाजारातही मंदीचे वातावरण कायम राहिले.अशा परिस्थितीत अमर्त्य सेन यांना अर्थशास्त्रासाठी मिळालेला 'नोबेल पुरस्कार' हा विरोधाभासच वाटू शकेल.**

गेल्या वर्षाच्या सुरूवातीपासूनच लोकांना निवडणुकांची चाहूल लागली होती. ४ डिसेंबर १९९७ रोजी राष्ट्रपती के.आर.नारायणन यांनी अकरावी लोकसभा मुदतपूर्व विसर्जित केली. त्यामुळे आपल्याला शेकडो कोटी रुपये खर्चाच्या ह्या निवडणुकांना अवघ्या दीड वर्षात दुसऱ्यांदा सामोरे जावे लागले. याच कालावधीत देशात तीन पंतप्रधान होऊन गेले. अशा परिस्थितीमुळे साहजिकच 'राजकीय स्थैर्य' हा या निवडणुकीतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा बनला. काँग्रेसने 'स्थैर्य, अनुभव व विकास' असे ब्रीद वाक्य जाहीर केले तर संयुक्त आघाडीने आपल्या दीड वर्षाच्या शासनाची कामगिरी लोकांसमोर ठेवली. भारतीय जनता पार्टीने (भाजपा) 'सक्षम पंतप्रधान आणि स्थिर प्रशासन'(Able primeminister and stable Goverment) असे ब्रीद वाक्य प्रसिद्ध केले.

सुरुवातीपासूनच पारडे भाजपाच्या बाजूला झुकले असल्याचे दिसत होते. याची अनेक कारणे होती. श्री. अटलबिहारी वाजपेयी यांची स्वच्छ आणि कार्यक्षम नेता अशी लोकप्रियता ही एक मोठी जमेची बाजू होती. तसेच भाजपाने अनेक राज्यात स्थानिक पक्षांशी केलेली युती-तामिळनाडूमधे अण्णाद्रमुक, बिहारमध्ये समता पार्टी, पश्चिम बंगालमधे तृणमूल काँग्रेस इ. लाभदायक ठरत होती. पण अशातच सोनिया गांधींनी राजकारणात पदार्पण केले. त्यांच्या प्रचारसभांना देशभर प्रचंड प्रतिसाद मिळत गेला. पण त्यामुळे भाजपाच्या विजयी घोडदौडीस काही प्रमाणात लगाम बसला.

दोन मार्चला मतमोजणी सुरू झाली अन् दोन दिवसांतच मतदात्यांचा कौल स्पष्ट झाला. पुन्हा एकदा जनतेने कुठल्याच पक्षाला निर्णायक बहुमत दिले नाही. भाजपा आणि मित्रपक्षांना २५४ (१८२+७२) जागा मिळाल्या तर काँग्रेसला १४१ आणि संयुक्त आघाडीस ८३ जागांवर समाधान मानावे लागले. निकालानंतर भाजपा युतीला तेलगु



देसम, हरियाणा लोकदल इ. पक्षांनी पाठिंबा जाहीर केला. पण अशातच अण्णा द्रमुकच्या नेत्या श्रीमती जयललिता यांनी अटींचे राजकारण करत आपल्या पाठिंब्याचे पत्र राष्ट्रपतींना पाठविण्यास उशीर केला. अखेरीस १९ मार्च रोजी म्हणजेच निकाल जाहीर झाल्यानंतर तब्बल दोन आठवड्यानंतर श्री. अटलबिहारी वाजपेयी यांचा भारताचे १६ वे पंतप्रधान म्हणून शपथविधी झाला.

गेल्या आठ महिन्यातील खडतर वाटचाल पाहता श्री. वाजपेयींनी काटेरी मुकुट घातला आहे, हे स्पष्ट होते. एका बाजूला लोकसभेत अत्यल्प बहुमत तर दुसऱ्या बाजूला समता-ममता जयललिता या 'मित्रा'कडून येणारा दबाव. यातच भाववाढ, बेरोजगारी इ. प्रश्नांवरील सरकारच्या अपयशामुळे विरोधकांचे टीकास्त्र सतत चालू आहे. थोडक्यात, म्हणजे भाजपा सरकारची



**'नावीन्यपूर्ण प्रकल्प कसे करावेत ? ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन, किंमत रु. ५०/-**

तारेवरची कसतरत सुरू आहे.

गुजरात आणि हिमाचल प्रदेशमध्ये सार्वत्रिक निवडणुकांबरोबरच विधानसभेच्या निवडणुकासुद्धा घेण्यात आल्या. दोन्ही ठिकाणी भाजपाने आपले सरकार पुनःप्रस्थापित केले. पण अवघ्या सहा महिन्यात राजस्थान, मध्यप्रदेश आणि दिल्ली या तीन महत्त्वाच्या आणि भाजपाचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या राज्यांमध्ये, विधानसभेच्या निवडणूका झाल्या.यामधे भाजपाचा दारुण पराभव झाला. तिन्ही राज्यांत काँग्रेसला भरघोस यश मिळाले. एप्रिलमधे काँग्रेसपक्षाचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर सोनिया गांधींनी पक्षाच्या नूतनीकरणाचा जो कार्यक्रम सुरू केला त्याचे हे यश मानले जाते. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे कारण म्हणजे भाजपा सरकारचे प्रशासनातील अपयश! विरोधी पक्षांनी महागाईचा मुद्दा मुख्यत्वेकरून लोकांसमोर ठेवला. इवल्याशा कांद्याने सरकारच्या डोळ्यात पाणी आणले, असे म्हणणे अजिबात गैर होणार नाही.

या राज्यांव्यतिरिक्त गोवा आणि उत्तरप्रदेश मधील घटना लोकशाहीला काळीमा फासणाऱ्या ठरल्या. गोव्यमधे दोनदा सत्ताबदल झाला. दोन्ही वेळेला मंत्रीपदाचे व पैशाचे आमिष दाखवून एकमेकांच्या गटांची मोडतोड करून नवीन सरकार बनविण्यात आले. उत्तरप्रदेशातसुद्धा मुख्यमंत्री कल्याणसिंह यांनी बहुजन आणि काँग्रेस पक्ष यशस्वीरित्या फोडले. एवढ्यावरच न थांबता फुटीर आमदार टिकविण्यासाठी त्यांनी त्या 'सर्वांना' मंत्रीपद दिले. अशाप्रकारे नव्वदच्यावर संख्येचे मंत्रीमंडळ स्थापून त्यांनी एक उच्चांक प्रस्थापित केला. पण त्याचबरोबर हा भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील नैतिक स्तरावरील एक निचांकही आहे.

भाजपाच्या निवडणूक घोषणापत्रात व सरकार स्थापनेनंतर राष्ट्रीय कार्यक्रमामधेही भारताच्या आण्विक धोरणांचा पुनर्विचार करण्याचे ठळकपणे मांडण्यात आले होते. पण जेव्हा ११ मे रोजी पंतप्रधनांनी भारताने अणुचाचण्या केल्याचे घोषित केले तेव्हा संपूर्ण भारतच नव्हे तर संपूर्ण जग स्तब्ध होऊन ऐकत राहिले. बरोबर २४ वर्षांनी इतिहासाची पुनरावृत्ती होत होती. १९७४ च्या बुद्धपौर्णिमेला भारताने पहिली अणुचाचणी केली होती. पण त्यानंतर धोरणात्मक संयम आणि आंतरराष्ट्रीय दबावामुळे भारताने अणुचाचण्या घेतल्या नाहीत. यावेळी मात्र निर्णय पक्का होता. अमेरिकेच्या उपग्रहांना चकविण्याचे सर्व सापळे तयार होते. ११ मे १९९८- बुद्धपौर्णिमा- दुपारी ३.४५ वाजता पोखरणच्या वाळवंटात तीन अणुस्फोट झाले. बुद्धपौर्णिमेला झालेल्या या दोन्ही अणुचाचण्यानंतर बुद्ध नक्कीच हसला असेल. खरंतर भारताने आपण जगातील सहावी अणुशक्ती झाल्याची ही जोरदार घोषणाच केली होती! १३ मे रोजी अजून दोन अणु चाचण्या घेण्यात आल्या. या पाच चाचण्यांपैकी एक थरमोन्यूक्लियर (हायड्रोजन बॉम्ब), एक फिशन, तर उरलेल्या तीन सबकिलोटन चाचण्या होत्या. या चाचण्यांमुळे भारत आता आण्विक ज्ञानाच्यादृष्टीने पूर्णपणे आत्मनिर्भर झाला आहे.



भारतामध्ये या अणुचाचण्यांचे उत्स्फूर्त स्वागत झाले. अभिमत चाचण्यांच्या अनुसार (Opinion Polls) देशातील ८५ ते ९० टक्के लोकांनी अणुस्फोटांना पाठिंबा दर्शविला. परंतु विरोधी पक्षांनी या चाचण्यांच्या मागे राजकीय हेतू असल्याचा आरोप केला. भारताबाहेर अणुस्फोटांचा अतिशय तीव्रतेने निषेध केला गेला. अमेरिकेने भारतावर कडक आर्थिक निर्बंध लादले. जपानसह इतर अनेक देशांनीसुद्धा भारताला दिली जाणारी कडक आर्थिक मदत थांबवली. पण लगेचच भारताने आपली बाजू सर्व देशांसमोर मांडली. भारताच्या संरक्षणास धोका निर्माण झाल्यामुळे या चाचण्या अनिवार्य होत्या आणि अण्वस्त्रांचा उपयोग आपण आक्रमणासाठी कधीच करणार नाही, हे सर्वांना पटवून सांगण्याचा प्रयत्न केला गेला. या सर्व प्रयत्नांमुळे गेल्या सहा महिन्यांत भारताचे इतर देशांबरोबरचे राजकीय आणि आर्थिक संबंध निश्चितच सुधारले आहेत.

या अणुचाचण्यांचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर खूप मोठा प्रभाव पडला आहे. मुख्यत्वेकरून पाकिस्तान



'छंद आकाश दर्शनाचा' छात्र प्रबोधन प्रकाशन, किं. रु. ५०/-

बरोबरील संबंध खूपच बदलले आहेत. पाकिस्तानने एप्रिलमध्ये 'घौरी' या मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्राची चाचणी घेतली . या क्षेपणास्त्रामुळे भारतातील सर्व प्रमुख शहरे पाकिस्तानच्या आक्रमण सीमेत आली आहेत. याशिवाय त्यांचे छुपे अण्विक धोरण आणि त्यांच्याकडे अण्वस्त्र असल्याची माजी सेनाप्रमुखांची ग्वाही या सर्वांमुळेच भारताची सुरक्षा धोक्यात आली होती. त्यामुळे भारतास अणुचाचण्या करणे भाग पडले.पण ३१ मे रोजी पाकिस्ताननेसुद्धा 'छगाई' या ठिकाणी अणुचाचण्या केल्या. काही देशांनी या चाचण्यांबद्दलही भारतासच दोषी ठरविले. त्यांच्यामते भारतामुळेच ही अण्वस्त्रांची दौड सुरू झाली आणि त्यामुळे फक्त दक्षिण आशियाची नव्हे तर संपूर्ण जगाची सुरक्षा धोक्यात आली आहे. खरं पाहिले तर, सध्याच्या परिस्थितीत अण्वस्त्रांचा वापर होणे अशक्यच आहे.याचे एक सोपे कारण आहे. अण्वस्त्रसुद्धात जर एका देशाने दुसऱ्या देशाची महत्त्वाची शहरे नष्ट केली तर दुसरा देशसुद्धा त्यांची महत्त्वाची शहरे नष्ट करेल. इंग्रजीमधे याला एक साजेसे नाव दिले आहे- Mutually Assured Destruction (MAD).थोडक्यात सांगायचे तर, अण्वस्त्र युद्ध कुणालाही जिंकता येणार नाही. त्यामुळे दोन्ही देशांनी आता युद्धाचा मार्ग सोडून अधिक समंजपणे शांततेचा मार्ग अवलंबला पाहिजे.

काश्मिरचा मुद्दा पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय स्तरावर गेला. हा अणुचाचण्यांचाच एक वाईट परिणाम. काश्मिरचा प्रश्न लवकर न सुटल्यास त्यामुळे भारत-पाकिस्तान अण्वस्त्रयुद्धाचा धोका आहे, असे काही देशांचे मत झाले. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी त्यांनी मध्यस्थी करण्याची तयारी दर्शविली. हे भारताच्या धोरणाच्या अगदी विरुद्ध आहे. काश्मिर हा भारताचा अविभाज्य घटक आहे आणि तो भारताचा अंतर्गत प्रश्न आहे असे भारताचे मत आहे. भारताचे हे धोरणही आता बऱ्याच देशांना पटले आहे. सध्या भारत-पाकिस्तान दरम्यान सचिव स्तरावरील बोलणी सुरू आहेत, फक्त त्या मधेच ह्या प्रश्नावर चर्चा होत आहे.

मे महिन्यातील अणुचाचण्यांच्या आधीच भारतावर आर्थिक मंदीचे सावट पसरले होते. पण चाचण्यांनंतरच्या आर्थिक निर्बंधांमुळे ही स्थिती आणखीनच गंभीर झाली आहे. जेव्हा देशाच्या आर्थिक प्रगतीचा राष्ट्रीय उत्पादनाचा व निर्यातीचा दर कमी होऊ लागतो, आणि त्याचबरोबर देशात महागाई व बेरोजगारीचे प्रमाण वाढते त्यावेळी असलेल्या परिस्थितीला 'आर्थिक मंदीची स्थिती' म्हणतात. भारतात आर्थिक मंदी सुरू होण्याची अनेक कारणे आहेत. खूप वेळ चालत असलेली राजकीय अस्थिरता हे एक महत्त्वाचे कारण आहे. राजकीय अस्थिरतेमुळे देशातील व देशाबाहेरील गुंतवणुकदारांचा विश्वास कमी होतो. गुंतवणुकीच्या अभावामुळे उत्पादन कमी होते, महागाई वाढते आणि रोजगार निर्मिती कमी होते. राजकीय अस्थिरतेमुळे सरकारची आर्थिक धोरणे सतत बदलत राहतात व त्यांची अंमलबजावणी नीट होऊ शकत नाही. अशामुळे आर्थिक प्रश्नावर तोडगा काढणे अवघड होऊन बसते. भारताच्या अंतर्गत परिस्थिती बरोबरच आंतरराष्ट्रीय अर्थरचनेचासुद्धा परिणाम भारतावर होतो. १९९१ नंतर भारताने आर्थिक उदारीकरणाचे जे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे हा परिणाम अधिकच तीव्रतेने जाणवू लागला आहे.

## नैसर्गिक आपत्ती - अपघात - दुर्घटना

| | |
|---|---|
| जून १९९८ | गुजराथ किनारपट्टीवर आलेल्या चक्री वादळाने ६०० च्या वर मृत्युमुखी पडले, लाखो बेघर झाले आणि कोट्यावधी रुपयांची मालमत्ता नष्ट झाली. |
| ऑगस्ट १९९८ | उत्तरप्रदेशातील रुद्रप्रयाग जिल्ह्यात भूसरणामुळे माल्पासह काही गावे नष्ट झाली. ३५० मृतांमध्ये अनेकजण कैलास-मानस सरोवराचे यात्रेकरु होते. |
| नोव्हेंबर १९९८ | पंजाबमधील खन्ना या ठिकाणी गोल्डन टेंपल मेल ही गाडी रुळावरुन घसरली आणि दुसऱ्या बाजूने येणाऱ्या गाडीची टक्कर होऊन भीषण अपघात झाला. |
| सप्टेंबर १९९८ | अमेरिकेहून स्वित्झरलंडला जाणारे विमान नोव्हास कोटीमा या ठिकाणी समुद्रात कोसळले. या दुर्घटनेत प्रवास करणारे सर्व २२९ जण मृत्युमुखी पडले. |

'राष्ट्रार्थ जीवन जगू' प्रण हा अभंग; आपत्ती दुःख भवती असता अथांग

**'प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास'** (ललित लेखन कसे करावे, याचा मूलमंत्र देणारे पुस्तक) ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन, किं .रु. ३०/-

गेल्या दीड वर्षात दक्षिणपूर्व आशियातील सर्व देशांच्या अर्थव्यवस्था डबघाईला आल्या आहेत. जपान आणि रशिया हे दोन बलाढ्य देशसुद्धा आर्थिक मंदीच्या कचाट्यात सापडले आहेत. इतर देशांतील मंदीमुळे भारतीय वस्तूंची मागणी घटली आहे, म्हणजेच भारताची निर्यात कमी झाली आहे. जेव्हा एखाद्या देशाची आयात, निर्यातपेक्षा सतत जास्त असते तेव्हा देशात महागाई वाढते. त्याचबरोबर देशाच्यचलनाची किंमत डॉलरच्या तुलनेत कमी होते. भारतात सध्या याच प्रकारची परिस्थिती आहे. यातून मार्ग काढण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेचे आणि शासनाचे प्रयत्न अपुरे पडत आहेत असे दिसते.

आता एक नजर विज्ञान विश्वाकडे दि. १७ नोव्हें. रोजी या शतकातील सर्वात दिव्य असा उल्कापात झाला. टेंपल टटल या पृथ्वीच्या कक्षेतून प्रवास करणाऱ्या धूमकेतूमुळे हे अभूतपूर्व दिव्य घडले. परंतु भारतासह काही अन्य ठिकाणी जमलेल्या शास्त्रज्ञांची व नागरिकांची खराब हवामान व ढगाळ वातावरणामुळे निराशा झाली.

माहिती तंत्रज्ञान (information technology) क्षेत्रातील क्रांतीचा वेग व विस्तार ही या वर्षातील अजून एक महत्त्वाची घटना. इंटरनेट व मोबाईल फोन्सच्या व्यापक प्रसारामुळे जगाचे रूपांतर खेड्यात होत आहे.(Global Village) या क्षेत्रातील भारताची कामगिरी लक्षणीय आहे. पुण्यातील C-DAC या संस्थेने परम (TEN THOUSAND) हा महासंगणक विकसित केलेला आहे. आशियातील सर्वात जलद आकडेमोड करण्याची क्षमता असलेला हा महासंगणक आर्थिक , आण्विक, भौगोलिक व सैनिकी क्षेत्रांमध्ये भविष्यात महत्त्वाची कामगिरी बजावू शकेल.

परंतु या क्षेत्रात YEAR TWO THOUSAND (Y2K) हा सर्वांना भेडसावणारा प्रश्न उद्भवला आहे. जुन्या संगणकांमध्ये वर्षाचा उल्लेख फक्त शेवटच्या २ आकड्यांनी करण्याची पद्धत आहे. यामुळे दि. १ जाने. २००० रोजी सर्व संगणक ०० असा वर्षनिर्देश करतील. यामुळे बँका, विमा कंपन्या, रेल्वे आरक्षण या सारख्या अनेक क्षेत्रांमध्ये गंभीर समस्या निर्माण होतील. हा प्रश्न सोडविण्यासाठी जगातील सर्व देश काळाशी स्पर्धा करत आहेत.

आरोग्य क्षेत्रात मोहरीच्या तेलांची भेसळ व आयोडिनसुक्त मीठाची सरकारने केलेली सक्ती या विशेष नोंद घेण्यासारख्या घटना आहेत. मोहरीच्या तेलात धोतरा या विषारी वनस्पतींच्या बियांचे प्रमाण वाढल्यामुळे अनेक जण 'ड्रॉप्सी' या रोगास बळी पडले. या रोगास आळा घालण्यासाठी शासनाने दिल्लीसह अनेक राज्यात मोहरीच्या सुट्ट्या तेलाच्या विक्रीवर बंदी घातली. दुसऱ्या बाजूला आहारातील आयोडिनच्या कमतरतेमुळे होणारे आजार टाळण्यासाठी सरकारने आयोडिनयुक्त मीठ वापरणे सक्तीचे केले आहे.

खेळ जगतात हे वर्ष फ्रान्समध्ये आयोजित करण्यात आलेल्या फुटबॉल विश्वचषक स्पर्धांमुळे गाजले. फ्रान्सने गतविजेत्या ब्रझिलचा अंतिम सामन्यात ३–० सा दणदणीत पराभव करून पहिल्यांदाच विश्वचषक पटकावला. डेवोस सुकर या क्रोयेशियन खेळाडूने या स्पर्धेत सर्वात जास्त म्हणजे ६ गोल नोंदवून 'गोल्डन बूट' हा किताब मिळविला. परंतु अंतिम सामन्यात दोन गोल करणारा झिनेदीन झिदान या स्पर्धेचा खरा हिरो ठरला.

भारतीय खेळाडुंना या वर्षी संमिश्र यश मिळाले. विश्वनाथन आनंद याला यावर्षीचा Chess Oscar पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार मिळविणारा तो

## आंतरराष्ट्रीय घडोमोडी

| | |
|---|---|
| ७ ऑगस्ट १९९८ | Islamic Army for the Liberationof Muslim holy site या अतिरेकी संघटनेने नैरोबी (केनिया) आणि दारे सलाम (टांझानिया) येथील अमेरिकेच्या दूतावासांजवळ प्रचंड बाँबसेफोट घडविले. |
| २० ऑगस्ट १९९८ | प्रतिकारात्मक पाऊल म्हणून अमेरिकेने सुदान आणि अफगाणिस्तान येथील मुस्लिम अतिरेक्यांच्या प्रशिक्षण शिबिरांवर क्षेपणास्त्रांचा हल्ला केला. |
| ऑक्टोबर १९९८ | इस्त्राइलचे पंतप्रधान श्री. बेंजामिन नेतानयाहू आणि पॉलिस्टीनी मुक्ती संघटनेचे अध्यक्ष श्री. यासर अराफात यांच्यात अमेरिकेच्या मध्यस्थीने शांतता करार झाला. |
| डिसेंबर १९९८ | संयुक्त राष्ट्रसंघाच्या निरिक्षकांच्या कामात अडथळे निर्माण केल्याचा आरोप करुन अमेरिका आणि ब्रिटनने इराकवर बाँब हल्ला केला. या एकतर्फी कृत्याचा रशिया, चीन व फ्रान्ससह सर्वच देशांनी निषेध केला आहे. |

नव आव्हाने पेलायाला नवीन ईर्ष्या, नवे पराक्रम, गतकालावर मात करोनि उभवायाचे नवीन विक्रम

प्रबोधन गीते - भाग २' (प्रबोधिनीतील ११ स्फूर्तिगीतांची ध्वनिफीत) ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन किं. रु. ४०/-

पहिला आशियाई बुद्धिबळपटू आहे. टेनिसमध्ये लिएन्डर पेस आणि महेश भूपती यांनी दुहेरीतील विजयी घोजदौड कायम ठेवली. या वर्षाअखेरीस त्यांना ए.टी.पी. क्रमवारीत तिसरे मानांकन प्राप्त झाले. लिएंडर पेसची वैयक्तिक कामगिरीही उल्लेखनीय ठरली. त्याने विश्वविजेत्या पीट सॅम्प्रॅसलाही पायलट पेन स्पर्धेत गारद केले. त्याचबरोबर त्याने ए.टी.पी. क्रमवारीत पहिल्या शंभर मानांकनात प्रवेश केला. परमजीतसिंगने ३७ वर्षे अबाधित राहिलेला मिल्खा सिंगचा ४०० मि. दौड शर्यतीतील विक्रम मोडला. त्याने ४५.७० सेकंदाचा नवा राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला. या वर्षीचा राजीव गांधी 'खेलरत्न पुरस्कार' विजेता सचिन तेंडुलकरने हे वर्ष एकामागोमाग एक विक्रम मोडत गाजवले. एकाच वर्षात त्याने एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक म्हणजे २१ शतके त्याच्या नावावर नोंदवली गेली.

तेंडुलकर व्यतिरिक्त अजून एका महाराष्ट्रीयन व्यक्तीने या वर्षी अभिमानास्पद कामगिरी केली. पुण्यातील टेल्को कंपनीमधे काम करणारा सुरेंद्र चव्हाण एव्हरेस्ट शिखरावर स्वारी करणारा पहिला महाराष्ट्रीयन ठरला.

या वर्षाची सांगता बँकॉक येथे पार पडलेल्या १३ व्या आशियाई क्रीडास्पर्धांनी झाली. ७ सुवर्ण, ११ रौप्य आणि १७ कांस्य पदके जिंकून भारताने नववे स्थान मिळविले. ज्योतीर्मय सिकंदर ही महिला २०० मीटर आणि १५०० मीटर स्पर्धांमध्ये सुवर्णपदके जिंकून भारताची वनी सुवर्णकन्या ठरली. धनराज पिल्लेच्या नेतृत्वाखालील हॉकीच्या पुरुष संघाने बत्तीस वर्षानंतर आशियाई स्पर्धेतील सुवर्णपदक जिंकले. या सुपर्णपदकामुळे पुढील ऑलिमम्पिक स्पर्धांसाठी भारत पात्र ठरला आहे. कबड्डी संघाने लागोपाठ तिसऱ्यांदा पदक जिंकून भारताचे वर्चस्व कायम राखले. अशोक शांडील्याने बिलियर्डस्‌मध्ये एकेरी आणि दुरेहीचे सुवर्णपदक जिंकले. ५४ किलो गटातील मुष्टीयुद्धाचे सुवर्णपदक जिंकून डिंगोसिंग मुष्टीयुद्धातील १२ वर्षातील पहिला विजेता ठरला. या स्पर्धांमधे १२९ सुवर्णपदके जिंकून चीन प्रथम आले. तर ६४ सुवर्णपदकांनीशी दक्षिण कोरिया दुसऱ्या व ५२ सुवर्णपदकांनीशी जपान तिसऱ्या क्रमांकावर आले.

हे वर्ष गाजविलेल्या व्यक्तींमध्ये अमर्त्य सेन यांचे नाव सर्वप्रथम घेणे संयुक्तिक ठरेल. त्यांना या वर्षीचा अर्थशास्त्राचा 'नोबेल पुरस्कार' मिळाल. नोबेल पुरस्कार मिळविणारे हे सहावे भारतीय आहेत. आर्थिक विकास, दारिद्रय निर्मूलन व दुष्काळ या विषयांतील त्यांच्या मूलभूत संशोधनाचा



आंतरराष्ट्रीय हॉकी संघाचा कर्णधार धनराज पिल्ले



**अमर्त्य सेन**

हा गौरव आहे.

भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या भारतरत्न पुरस्काराने खालीर सहा व्यक्तींना यंदाच्या वर्षी गौरवण्यात आले.

१. ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक व माजी हंगामी पंतप्रधान मा. गुलझारीलालजी नंदा यांना मरणोत्तर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

२. ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक व सामाजतिक कार्यकर्त्या अरुणा असफअली यांनाही हा पुरस्कार मरणोत्तर प्रदान करण्यात आला.

३. पंतप्रधानांचे विज्ञानविषयक सल्लागार, DRDO चे अध्यक्ष, ज्येष्ठ वैज्ञानिक ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना त्यांच्या भारताच्या आण्विक व क्षेपणास्त्र कार्यक्रमातील महत्त्वपूर्ण योगदानाबाबत हा पुरस्कार देण्यात आला.

४. ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी सी. सुब्रण्यम यांना त्यांच्या हरीत क्रांतीच्या प्रवर्तनासाठी हा पुरस्कार देण्यात आला.

५. कर्नाटक शैलीच्या ज्येष्ठ शास्त्रीय गायिका एम. एस. सुब्बालक्ष्मी यांनाही या पुरस्काराने गौरविण्यात आले. संगीत क्षेत्रातील व्यक्तीस मिळणारा हा पहिलाच भारतरत्न

*इतिहासाच्या पानोपानी पराक्रमाची गाथा, कलिकाळातही अजिंक्य आम्ही जगती उन्नत माथा.*

**'कल्पक बनू या'** (कल्पनाशक्ती वाढविण्याची गुरुकिल्ली सांगणारे पुस्तक) ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन. किं. रु. ५०/-

पुरस्कार आहे.

६. नुकताच २४ डिसेंबर रोजी श्री. जयप्रकाश नारायण यांना भारतरत्न हा पुरस्कार मरणोत्तर देण्यात येणार असल्याचे जाहीर झाले. स्वातंत्र्यलढ्यातील सक्रीय सहभाग, भूदान चळवळीतील सहभाग, गुजराथ, बिहार मधील भष्ट्राचाराविरोधी आंदोलने, १९७५ च्या आणीबाणी विरोधातील लढा हे जयप्रकाशजींच्या जीवनातील महत्त्वाचे योगदान!

या वर्षी चित्रपट क्षेत्रातील सर्वाच्च दादासाहेब फाळके पुरस्कार कवि प्रदीप यांना देण्यात आला. त्यांनी अनेक चित्रपटांसाठी गीते लिहिली होती. पण त्यांचे नाव भारतीयांच्या सदैव स्मरणात राहील ते त्यांच्या देशभक्तीवरील गीतांमुळेच. चीनच्या युद्धानंतर त्यांनी लिहिलेले 'ए मेरे वतन के लोगो' हे गाणे अशाच अजरामर गीतांपैकी एक आहे.

या वर्षी चित्रपट क्षेत्र गाजविले ते 'टायटॅनिक' या इंग्रजी चित्रपटाने अकरा ऑस्कर पुरस्कार जिंकून 'बेन-हर या चित्रपटाच्या विक्रमाची त्याने बरोबरी केली.

या लेखांमधे आपण १९९८ या वर्षात घडलेल्या विविध क्षेत्रातील महत्त्वाच्या घटनांचा आढावा घेतला. लोकशाही यशस्वी करण्यासाठी नागरिकांना सद्य घडामोडीबद्दल माहिती असणे खूप महत्त्वाचे असते. देशातील राजकीय बदल, आर्थिक, धोरणे व सामाजिक समस्या या सर्वांचा आपल्या जीवनावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यरित्या प्रभाव पडत असतो. त्यामुळे याबाबत केवळ बघ्याची भूमिका न घेता, आपण या मुद्द्यांबाबत माहिती घेऊन स्वतःची मते तयार केली पाहिजेत. यामुळे आपल्या जाणिवेची कक्षा विस्तारीत तर होतेच पण त्याच बरोबर आपल्या ज्ञानातही अमूल्य भर पडते. सध्या घेण्यात येणाऱ्या सर्व स्पर्धा परिक्षांमध्ये (IAS,NDA, बँका,रेल्वे इ.) चालू घडामोडींवर प्रश्न असतात. यामधे आयत्या वेळच्या अभ्यासाने चांगले गुण मिळू शकत नाहीत. त्यासाठी पहिल्यापासूनच वर्तमानपत्र वाचनाची सवय असावी लागते. पण त्यातही फक्त क्रीडा, सिनेमा, मनोरंजना ही पाने न वाचता अग्रलेख आणि चालू घडामोडींचे विश्लेषण वाचणे महत्त्वाचे असते. जर अशा वाचनाची आपल्याला सवय नसेल तर तशी सवय आपण लवकरात लवकर लावून घेतली पाहिजे. ह्याची सुरुवात म्हणून तुम्हाला एक गृहकार्य सुचवित आहे

१. वृत्तपत्रांतील बातम्या व अग्रलेखांच्या आधारे जानेवारी व फेब्रुवारी १९९९ या महिन्यातील राजकीय, आर्थिक, विज्ञान, कला, क्रीडा आणि सांस्कृतिक यापैकी कोणत्याही क्षेत्रांतील घडामोडीचा एका वृत्तलेख तयार करा. व तो 'छात्र प्रबोधन'कडे पाठवून द्या.त्याबरोबर **'मी चालू घडामोडींचे नियमित वाचन करीन'** असा संकल्पही करा!

●●

श्री राहुल नांगरे
१७८ शुक्रवार पेठ, पुणे २

## श्रद्धांजली

**दादा कोंडके** - मराठी चित्रपट सृष्टीतील लोकप्रिय विनोदी कलाकर व दिग्दर्शक सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट निर्मिती करून गिनिज बुकमधे नोंद.

**गो.नी.दांडेकर (गोनीदा)** -ज्येष्ठ मराठी इतिहासकार व साहित्यिक

**पंडित जितेंद्र अभिषेकी** - ज्येष्ठ शास्त्रीय गायक

**तलत मेहमूद** - हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय गझल आणि पार्श्वगायक

**कवी प्रदीप** - देशभक्तीवरील अनेक भावगीतांचे गीतकार. यावर्षीचा ज्ञानपीठ पुरस्कारही त्यांना मिळाला.

**कमलाकर सारंग** - ज्येष्ठ दिग्दर्शक व अभिनेते.

**वासुदेव पाळंदे** - सिने-नाट्यसृष्टीतील ज्येष्ठ कलाकार, भावना जोपसणारा शिक्षक.

**8 या इंग्रजी आकड्यातून पळणाऱ्या किड्याची आकृती:**



तुम्हीही असे आकडे शोधून विविध आकृत्या काढायचा प्रयत्न करा बरं!

कणकण, क्षणक्षण अर्पुन अपुले, घडवु राष्ट्र महान। देशभक्तिने समाज भारुन, करु या नवा निर्माण ॥

**'व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत (दुसरी आवृत्ती) ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन, किं. रु. ६०/- (सर्व स्थानिक केंद्रांवर उपलब्ध!**

# १०० दिवसांची साखरशाळा

**–गीतांजली देगावकर**

प्रिय प्रबोधक,

छात्र प्रबोधनच्या अंकामधून किंवा वेगवेगळ्या शिबिरांधून ज्ञान प्रबोधिनीत चालणाऱ्या अनेक उपक्रमांविषयी तुम्ही वाचले किंवा ऐकले असेल. आज त्यापैकीच एका वेगळ्या उपक्रमाविषयी माहिती करून घ्यायला नक्कीच आवडेल, हो ना ! उपक्रम आहे– **'१०० दिवसांची साखरशाळा.'**

उपक्रमाचे नाव वेगळेच वाटेल ना? शाळा खरंच १०० दिवस चालते का? कोणासाठी चालते? असे अनेक प्रश्न साहजिकच तुमच्या मनात आले असतील.

तुमच्यापैकी अनेकांनी साखर कारखाने नक्कीच पाहिले असतील! अगदी ऊसाची मोळी जिथून टाकली जाते तिथपासून साखर तयार होण्यापर्यंत. शिवाय त्याच्याविषयी अनेक प्रश्नही उत्सुकतेने विचारले असतील. साखर तयार करण्यासाठी जसे कारखान्यातील तंत्रज्ञ, कामगार, व्यवस्थापक, तसेच ऊस शेती करणारे शेतकरी महत्त्वाचे असतात, तसेच हा ऊस शेतातून कापून कारखान्यापर्यंत नेणारे ऊसतोडणी कामगारही महत्त्वाचे असतात. हे काम कौशल्याचे अन् खूप कष्टाचे असते.

या ऊस तोडणीच्या कामासाठी महाराष्ट्रातील काही जिल्ह्यातील लोक प्रसिद्ध आहेत. मुख्यतः मोठ्या प्रमाणात बीड जिल्ह्यांतील तालुके. महाराष्ट्रातील सर्व साखर कारखाने अन् गोवा, गुजराथ कर्नाटक येथील काही कारखान्यात या ठिकाणाहून ऊसतोडणीसाठी लोक जातात. ऑक्टोबर ते मे या कालावधीत हे लोत स्थलांतरित होतात. पूर्ण कुटुंबच स्थलांतर करते. साहजिकच घरातील मुलंही आपपल्या पालकांबरोबर जातात न् या काळात त्यांची शाळा बुडते. या मुलांची शाळा, शिक्षण यात खंड पडून, पुढे ही मुलंही अशिक्षित ऊसतोड कामगार बनतील. मात्र, ती तशी बनू नयेत म्हणून, त्यांच्या स्थलांतराच्या ठिकाणी शाळेची व्यवस्था होणे गरजेचे होते.

१९९२ साली अशाप्रकारे `या मुलांसाठी ज्ञान प्रबोधिनीने '१०० दिवसांची साखरशाळा सुरू केली. बालवाडी ते चौथीपर्यंत असणारी शाळा सुरुवातीला ५० विद्यार्थ्यांची होती. हळूहळू वाढत–वाढत यावर्षी २० ठिकाणी, एकूण १००० विद्यार्थ्यापर्यंत आपण पोहोचलो आहोत. मात्र कित्येक लाख मुलांपर्यंत अजून पोहोचायचे आहे.

वास्तविक या मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून, साखर कारखान्याच्या ठिकाणी अशा शाळांची शासनातर्फे व्यवस्था व्हायला हवी. जोपर्यंत ती होत नाही तोपर्यंत आपणच काहीतरी धडपड करायला हवी. या तळमळीने ज्ञान प्रबोधिनीतील युवक कार्यकर्त्यांच्या 'प्रचिती' गटातर्फे या शाळा चालविल्या जातात. **तेथे अध्यापनाचे काम करतात, तुमच्यासारखेच ८ वी, ९ वी या इयत्तातील विद्यार्थी** ! हे विद्यार्थी या मुलांच्या अडचणी जाणून घेतात. अगदी मूलभूत स्वच्छता करून घेणे, प्रार्थना, उपासना, खेळ, गाणी, नाटक इ. च्या बरोबर मुख्यतः त्यांचा अभ्यासही करून घेणे हे सर्व बाल–अध्यापक आपल्याहून मोठ्या अध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली करत असतात. त्यांच्यासमवेत राहणं, त्यांचा दिनक्रम, आर्थिक सामाजिक परिस्थिती जाणून घेणं, पालकांशी सुसंवाद साधणं हे अध्यापकाच्या भूमिकेतून करत असताना, या विद्यार्थ्यांच्या नकळत खूप मोठं अध्यनही होत असतं. आपल्या आणि आपल्या बालविद्यार्थ्यांच्या जीवनमानातील दरीची जाणीव त्यांना अस्वस्थ करते. त्यामुळे ते त्यांच्या जास्त जवळ जाऊ शकतात. ह्या अनमोल संधीची लाभ तुम्हीही घेऊ शकता. या



साखरळशाळांच्या रूपात देशाच्या विशाल विद्यापीठात शिकवण्याबरोबरच कुठेही मिळणार नाही अशी शिकण्याची संधी तुम्हाला व खूप लहान वयात मिळत आहे. जरुर पडल्यास आपल्या अध्यापकांची परवानगी घेऊन, तीन–चार दिवस शाळा बुडवून या उपक्रमात सहभागी झाला तर येथे मिळणारा अनुभव तुम्हाला खूप काही मिळवून देईल, 'सारे भीरतीय माझे बांधव आहेत.' असे रोज आपण प्रतिज्ञेत म्हणतो. या शब्दांमध्ये कृतिरूप प्राण भरण्याची ही संधी आहे.

मग तुम्हालाही आवडेल ना अशा शाळेत ३–४ दिवस सहभागी व्हायला? सध्या पुण्यातील थेऊरच्या परिसरात १३ ठिकाणी अशा शाळा सुरू आहेत. शिवाय अहमदनगर जिल्ह्यात राहुरी येथे, सोलापूर जवळ कुमठे येथे अन् इचलकरंजी येथेही अशा शाळा आहेत. यापैकी कुठेही सहभागी होता येईल. फक्त आधी त्या–त्या ठिकाणी संपर्क करायला हवा. (पत्ते खाली दिले आहेत.)

प्रत्यक्ष सहभाग तर घेता येईलच. शिवाय आपल्याकडे असणारी खेळणी, गोष्टीची पुस्तके, मागील वर्षीची चांगल्या अवस्थेतील शालेय पुस्तके, शालेय साहित्य इ. द्वारेही तुम्ही मदत करू शकता. मग येताय ना साखरशाळेत ! मुलं तुमच्यासारख्या दादा–ताईंची वाट पाहात आहेत !

●●

**श्रीमती गीतांजली देगावकर**
ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०

खडतर असले वाण घेतले स्वच्छेने तर आम्ही आमुच्या, या भूमीचे भाग्य अखेरी प्रयत्नातुनी घडेल आमुच्या

साखरशाळा संपर्क पत्ते : इचलकरंजी – श्री विनायक गद्रे, वॉर्ड क्र. ५ घर नं. ६८अ, झेंडा चौक, इचलकरंजी ४२४००८.
सोलापूर – ज्ञान प्रबोधिनी बाल विकास मंदिर, डफरिन चौक, सोलापूर ☎ ६२५७८२. राहुरी व थेऊरसाठी ज्ञानप्रबोधिनी पुणे येथे संपर्क साधावा.

## जानेवारी महिन्यातील कार्यक्रम

स्वामी विवेकानंद जयंती निमित्त उपक्रम - १२ जानेवारी हा स्वामी विवेकानंदांचा जन्मदिन ! तो आपण युवकदिन म्हणू साजरा करतो. त्यानिमित्त आपल्या येथील विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंदांचे चरित्र वाचण्यास सांगून त्यांच्या आयुष्यातील काही निवडक प्रसंगांवर आधारित ३ ते ५ मिनिटांचं कथाकथन, भाषण तयार करण्यास सुचवावे. अस भाषण त्यांच्याच शाळेत वर्गामध्ये व अन्यही छोट्या-मोठ्या शाळांमध्ये करण्यास सांगावे, असे निदान १० विद्यार्थी तरी तयार करावेत व प्रत्येकाचे किमान२ ते ठिकाणी कार्यक्रम व्होवेत. स्वामी विवेकनंदावरील एक गीत 'प्रबोधनगीते भाग-२' मध्ये आहे ते विद्यार्थ्यांकडून बसवून घेऊन तेही सादर करावे. शक्य असेल तेथे स्वामी विवेकानंदांच्या जीवनातील प्रसंगांवर आधारीत नाटक बसवावे. स्वामीजींच्या विचारांपैकी एखादा विचार पोस्टकार्डावर सुवाच्य हस्ताभारमध्ये लिहून अशी १० पोस्टकार्डेतरी आपल्या परिचितांना पाठवीत. प्रबोधिनीचे संस्थापक संचालक कै. आप्पा पेंडसे यांचे 'राष्ट्रद्रष्टे विवेकानंद' हे चरित्रात्मक पुस्तक निश्‍तिच उपयोगी पडेल.

'थोर महात्मे होऊन गेले चरित्र त्यांचे पाहा जरा. आपण त्यांच्या समान व्हावे हाची साापडे बोध खरा' हा या सगळ्या उपक्रमामागचा प्रधान हेतू समजावा. विद्यार्थ्यांनी एकत्र मिळून काही विशेष संकल्प त्यानिमित्ताने करावेत. सामूहिक व्यायाम (सूर्यनमस्कार, दोरीच्या उड्या इ.) करावा. अधिकाधिक कल्पना काढून नावीन्यपूर्ण व अर्थपूर्ण पद्धतीने विवेकानंद जयंती साजरी करून त्याचे वृत्त पाठवावे.

- पुण्याच्या STD कोड क्रमांकात बदल ! नवीन STD कोड क्र. ०२०
- रत्नागिरी, ठाणे, औरंगाबाद, कोल्हापूर, जळगाव येथे स्थानिक कार्यालयांची जबाबदारी सांभाळणारे, स्वयंसेवी वृत्तीने काम करणारे कार्यकर्ते हवे आहेत. इच्छुकांनी संपर्क साधावा.
- फेब्रुवारी-मार्च मधील संपादकांचे दौरे

फेब्रुवारी : १- नागोठणे, रोहा, २- पेण ३-४ रसायनी, पनवेल, ५-६ बोरविली, ७ - डोंबविली, ११ - बेळगाव, १२-१३-१४ गोवा, १५-१६ सावंतवाडी-कुडाळ, राजापूर १७-१८ रत्नागिरी, १९ देवरुख, २०-२१ चिपळूण, २२- दापोली, २३ - महाड

मार्च : १-२ नागपूर, ३ अचलपूर-दर्यापूर, ४ अमरावती, ५-६ नांदगाव, खांडेश्‍वर-कारंजालाड, वाशिम, मंगळूर, ७-८ अकोला, ९-१० बुलढाणा

## छात्र प्रबोधन नोंदणी केंद्र

खालील ठिकाणी छात्र प्रबोधनची नोंदणी केंद्रे आहेत. त्यांचे पत्ते वर्ष ७ अंक २ मध्ये दिले आहेत. अथवा त्याबाबत छात्र प्रबोधनच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा. या केंद्रावर छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी स्वीकारली जाईल. ज्ञान प्रबोधिनीची प्रकाशने विक्रीसाठी उपलब्ध असतील. विविध शिबिरांची माहिती येथे मिळेल व नावनोंदणीही होईल.

**मुंबई विभाग** : वसई, बोरीवली, विलेपार्ले, बांद्रा, मुलुंड, डोंबिवली, कल्याण, अंबरनाथ, बदलापूर

**कोकण विभाग** : रसायनी, पेण, नागोठणे, अलिबाग, किहीम, चिपळूण, दापोली, देवरुख, सावंतवाडी

**पश्‍चिम व दक्षिण महाराष्ट्र** : इचलकरंजी, सांगली, विटा, कराड, सातार, फलटण, बारामती, अहमनगर, सोलापूर, बार्शी

**उत्तर महाराष्ट्र** : नाशिक, नाशिक रोड, निफाड, धुळे, शहादा, चोपडा, चाळीसगाव

**मराठवाडा** : जालना, लातूर, परभणी, सेलू नांदेड, धाराशिव

**विदर्भ** : अकोला, मंगरुळपीर, कारंजालाड, हिवरामुरादे, नागपूर


याव्यतिरिक्त अन्य गावांमध्ये कोणाला स्थानिक नोंदणी केंद्रे चालविण्याची इच्छा असल्यास, छात्र प्रबोधनच्या, पुण्याच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक प्रा. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ पौष, शके १९२०,१ जानेवारी १९९९ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातुबाग, पुणे येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले.

चिंतनी इतिहासाच्या दिसती असंख्य नरवीरांच्या ज्योती, गाता स्वतंत्रतेची कीर्ती, घडवू नव संतान, भारत देश महान.

**'हसत खेळत बुद्धिविकास' (बुद्धिच्या विविध पैलूंसाठी विविध खेळ) ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन, किं. रु. १००/-**

तुम्हीही या अंकातील लेख वाचून उत्तमोत्तम प्रकाशचित्रे छात्र प्रबोधनकडे पाठवा.
तसेच चित्रांना शीर्षके द्या.



## नमुने काही उत्तम प्रकाशचित्रांचे...







प्रकाशचित्रकार : डॉ. प्रकाश जोगळेकर

तुम्हाला या तीन चित्रांवरून एखादी गोष्ट सुचतेय का?
अशी प्रकाशचित्र मालिका तुम्हीही पाठवा!

मागील अंकांमधील आवाहनाला प्रतिसाद म्हणून
पाठविलेल्या प्रकाशचित्रांमधील निवडक प्रकाशचित्रे



कु. सायली होनवाड, पुणे ४.



स्क्वाड्रन लीडर, शरदचंद्र ढाके, पुणे ४.



डॉ. व्ही. एन्. देशपांडे, अहमदनगर.

नोंदणी क्रमांक : PHM/22VIII/1997, टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन; PNCW/349, तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र.- L 128

# आपण सारे गाऊ या

एकमुखाने एकदिलाने आपण सारे गाऊ या
राष्ट्राचा ध्वज उंच धरोनि शिखरावरती जाऊ या॥

ध्येय आमुचे यशकिर्तीचे
कर्तव्याचे; परिपूर्तीचे
अभ्यासाने, व्यायामाने देहमनाला घडवू या॥

मातपित्यांचे विश्व आम्ही
स्पर्धेतील ना अश्व आम्ही
आज मनाच्या स्वैरपणाला लगाम भक्कम घालू या॥

जातपातीला मोडू या
बंधुत्वाला जोडू या
संघर्षाला गाडून आपण अणुयुगाला सांधू या॥

परमुलखाला जाऊ या
पुन्हा परतुनी येऊ या
या देशाच्या सरस्वतीला सन्मानाने वंदू या॥

रंगबिरंगी फुले आम्ही
या मातीची मुले आम्ही
सुगंध आमुचा इथे हवासा या मातीतच डोलू या॥
या मातीतच मिसळू या॥

संपर्क पत्ता :
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे 411030, ☎ (०२०) ४४७६९१/४४८९९५/[illegible]
कार्यालयीन वेळ : [illegible]
किंमत : रु. [illegible]
वार्षिक वर्गणी : रुपये १२५/-
प्रकाशन दिनांक : सौर ११ पौष शके १९२०
१ जानेवारी १९९९